परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १९, अंक ३. ऑगस्ट–सप्टेंबर २०२५







| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय...सहृदय नेतृत्व | २ |
| २. | रक्षाबंधन एक पवित्र पर्व | ३ |
| ३. | यज्ञेतिहासाची पाने पलटताना | ५ |
| ४. | आरोग्य रहस्य | ६ |
| ५. | ईश्वराच्या सांगाती : लच्छू दादीजी ! | ७ |
| ६. | योग्य रस्ता गवसला | ११ |
| ७. | चिंतन | १४ |
| ८. | कर्नल साहेबांचा अनुभव | १५ |
| ९. | "पृथ्वीचा गोळा हातात दिसला..." | १९ |
| १०. | शिवबाबांचा सल्ला | २१ |
| ११. | रूप – बसंत | २२ |
| १२. | दादी रतन मोहिनी यांचे काही मौलिक विचार | २५ |
| १३. | गुरुपौर्णिमा | २६ |


### मुखपृष्ठाविषयी

श्रावण महिना म्हणजे श्रीकृष्ण जन्माष्टमी, राखीपौर्णिमा आणि व्रतवैकल्यांचा मास. श्रीकृष्ण म्हणजे अध्यात्माच्या उद्दीष्टांचा परम बिंदू, हेच साधनेचे ध्येय. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वातील गूढ गोष्ट म्हणजे त्याचे नित्य स्मितहास्य. ब्रह्माकुमारी संस्थेच्या दिवंगत प्रशासिका दादी प्रकाशमणींनी आपल्या साधनेचे ध्येयही श्रीकृष्णासमान बनण्याचे ठेवले होते. दादीजींच्या चेहऱ्यावर देखील सदोदित स्मितहास्य फुललेले असे. या दोन गोष्टीतील साधर्म्य, दादीजींच्या आध्यात्मिक उंचीची आठवण करून देतात. परिस्थिती कितीही कठीण असो चेहऱ्यावरील हसू मावळू द्यायचे नाही हाच संदेश तुम्हा–आम्हाला जोपासायचा, अंगीकारायचा आहे. हीच दादीजींना खरी श्रद्धांजली ठरेल.

– प्रकाशिका


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व)–४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२



Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), Pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com

संपादकीय ...

# सहृदय नेतृत्व

नेतृत्व गुणाविषयी जगभरात विपुल संशोधन आणि लेखन झाले आहे. विस्तृत कालावधीवर नजर टाकली तर राजकीय, सामाजिक, आध्यात्मिक क्षेत्रातील वेगवेगळ्या व्यक्तींच्या जीवनात डोकावून पहावे आणि नेतृत्व कसे असते ते जाणावे. ज्युलियस सीझर, छ. शिवाजी महाराज, लो. टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर अशी अनेक नावे चटकन डोळ्यापुढे येतात. धर्म किंवा अध्यात्म म्हटले तर स्वामी विवेकानंद आठवतात, या पार्श्वभूमीवर ब्र.कु. संस्थेच्या दिवंगत प्रशासिका दादी प्रकाशमणी ठळकपणे आठवतात.

सर्वसाधारणपणे नेता म्हटले की काही गुणवैशिष्ट्ये प्रामुख्याने पहावीशी वाटतात. अलीकडच्या काळात प्रबंधन आणि नेतृत्व (मॅनेजमेंट आणि लीडरशीप) विषय अधिक चर्चिला जातो. खालील गुणवैशिष्ट्ये निकष म्हणून वापरली जातात.

१) Confidence – आत्मविश्वास

२) Humility – नम्रपणा

३) Responsibility–जबाबदारी निभावणे

४) Integrity – प्रामाणिकपणा

५) Creativity – कल्पकता

६) Setting Boundaries – मर्यादांचे कुंपण घालणे

७) Leading by example - स्वउदाहरणाद्वारे नेतृत्व

ही यादी बरीच मोठी होईल. यावर नजर टाकताना दादीजींच्या आठवणींचा फड मनात रंगू लागतो.

**अ) दादीजी प्रत्येक कामात, सेवेत अग्रणी राहत.** १९८६ सालची गोष्ट



आहे. आबूच्या परिसरात सलग तीन वर्षे दुष्काळ पडला होता. पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढत होते. आबू पर्वत नगर परिषदेद्वारे, नक्खी तलावातील गाळ काढणे, झरे मोकळे करणे ही महत्त्वाची कामे करण्याची गरज सांगण्यात आली. शासनाने, ब्र.कु. संस्थेला म्हणजेच पर्यायाने दादीजींना विचारले, तुमची संस्था, या सगळ्यात हातभार लावेल का ? दादीजींनी तात्काळ हो ! म्हटले.

सकाळच्या मुरली क्लासनंतर दादीजींनी घोषित केले आणि सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले. जणू काही 'श्रीरामाचे नाम गात या, श्रीरामाला पार करू' असे मधुबननिवासींना झाले. स्वत: दादीजी देखील कुदळ, फावडे घेऊन श्रमदानात सहभागी झाल्या. शासनाच्या अधिकाऱ्यांना ही बातमी कळल्यावर त्यांची धावपळ झाली. सगळे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले आणि त्या प्रसंगाला सोहळ्याचे रूप आले. हे होते सोदाहरण नेतृत्व.

**आ) मर्यादांचे कुंपण घालणे –** नेत्याला आपल्या सहकाऱ्यांमध्ये उत्साहाचे रोपण करावे लागते; पण त्याचबरोबर उत्साहाचे उधाण आले तर त्यावर नियंत्रणही ठेवावे लागते. ज्ञानसरोवर या संकुलाची निर्मिती झाल्यावर तेथे एक तलाव बांधला होता. त्यामागचा उद्देश केवळ सुशोभिकरण आणि पाण्याचा एक अडीअडचणींकरिता साठा एवढाच होता. तिथल्या मधुबननिवासी मंडळींचा उत्साह दांडगा होता. काहींनी रोज त्यात पोहण्याचा आनंद घ्यायला सुरुवात केली. दादीजींच्या कानावर ही गोष्ट गेली. शिस्त तर लावायची आणि नियम स्वीकारताना कुणाचे मन

(पृष्ठ क्र. ४ वर)



# रक्षाबंधन एक पवित्र पर्व

ब्र.कु. माधुरी, ठाणे

आपल्या भारत देशात अनेक सण, उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात त्यापैकी 'रक्षाबंधन' हा पवित्र सण. सर्वजण बंधनातून मुक्त होऊ पाहतात. पण रक्षाबंधनात मात्र बांधून घेण्यास तयार असतात. हे बंधन रक्षणाशी संबंधित आहे, सूत्राशी संबंधित आहे. म्हणूनच सर्वांना आवडते. पूर्वीच्या काळी राजे महाराजे आपल्या प्रजेच्या रक्षणार्थ हातावर प्रतिज्ञेचा धागा बांधायचे. रजपूत माता लढाईसाठी जाणारा पती, भाऊ, मुलगा यांच्या हातावर विजयी होण्यासाठी, रक्षण व्हावे याकरिता धागा बांधत, चंदन लावत. ब्राह्मणसुद्धा घरी जाऊन राखी बांधत असत. व्रत पूर्ण करण्यासाठी सुद्धा धागा बांधला जातो. रक्षाबंधन एक पवित्रता, स्वच्छता, प्रेम या सर्वांचे प्रतीक आहे.

विचार केला तर रक्षाबंधन यात दोन स्वतंत्र शब्द आहेत. एक रक्षा व दुसरे बंधन. रक्षा कोणाची व कोणापासून व बंधने तरी कोणती! आपण मात्र परंपरेनुसार रीतिरिवाजानुसार सण साजरे करत असतो. परंतु याचा कधीही विचार करत नाही की आज बंधन म्हटले की सर्वांना नको आहे मग ते शारीरिक असो की मानसिक वा सामाजिक तरीही रक्षाबंधन मात्र सगळ्यांना आकर्षित करते. काय बरे असेल याचा आध्यात्मिक अर्थ वा रहस्य?

आज प्रत्येक व्यक्ती आपल्या शरीराची रक्षा करण्याकरिता कितीतरी प्रयत्न करतो. परंतु शेवटी त्याला हेच म्हणावे लागते. ज्याचे दिवस भरले त्याला जावे लागणार किंवा नियतीचा फासा कळत नाही.

दुसरे धर्म रक्षण. यवनी राज्यकर्त्यांच्या काळात अनेक हिंदू स्त्रिया मुसलमान भाऊंना राख्या बांधत जेणेकरून त्यांच्या सतीत्त्वाची रक्षा व्हावी. परंतु तरीही माणूस सर्वसमर्थ तर नाहीच. त्यावेळी कित्येक बहिणींचे लज्जा रक्षण झाले नाही. द्रौपदीने पण आपल्या शीलरक्षणार्थ परमेश्वराचाच धावा केला होता.

मरणापासून म्हणजेच काळापासून रक्षा कोणीच माणूस करू शकलेला नाही. सिकंदराचे उदाहरण पाहू या. त्याने अनेक सैनिकांना मारले पण स्वत:चे रक्षण काळापासून नाही करू शकला. म्हणजेच काय तर आपण स्वत:चे रक्षण करण्यास असमर्थ आहोत. शेवटी, व्यक्ती संसारातील समस्या, प्रकोप, संकटे या सगळ्या पासून रक्षण व्हावे ही अपेक्षा करतो. म्हणजे शारीरिक, मानसिक, धार्मिक, सामाजिक, कालापासून, संकटापासून या सर्वांपासून व्यक्ती आपले रक्षण व्हावे यासाठी धडपडत असतो. परंतु तो स्वत:ची व इतरांची रक्षा करु शकतो का? तर नाही! कारण तेवढी सर्वसामर्थ्यवान व्यक्ती कोणी नाही. मग पुन्हा प्रश्न उरतो की, रक्षण कोण करणार व बंधने तरी कोणती?

रक्षा हा शब्द केवळ शारीरिक रक्षण येथपर्यंत मर्यादित नाही तर रक्षण त्याचबरोबर, धर्माचे, पवित्रतेचे, काळा पासून, संकटे, समस्या, संसारातील विघ्ने या सर्वांपासून रक्षण हा खरा आध्यात्मिक अर्थ आहे. तसे बघायला गेले तर पूर्ण सृष्टीकल्पाची गोष्ट ऐकली तर लक्षात येईल की सत्ययुग, त्रेतायुगात मनुष्य आत्मा संपूर्ण निर्विकारी, पवित्र होता, त्यांना सुख व स्वराज्य प्राप्त होते. श्रेष्ठाचार व श्रेष्ठ कर्म यामुळे त्यांना ते देवी-देवता संबोधले जाई. तेच देवी-देवता जेव्हा द्वापार युगात देहभानाच्या अधीन झाले व काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार या विकाराच्या प्रभावामुळे त्यांनी आपले दैवत्व गमावले आणि ते अनेक विकारांच्या बंधनात बांधले गेले. ज्यामुळे शारीरिक आकर्षण, हेवा, देहाचे भान अशा अनेक बंधनात मनुष्य बांधला गेला. आणि ह्या सर्व बंधनांचे पाश जेव्हा प्रचंडपणे आवळले गेले. त्यावेळी त्यांनी परमेश्वराला 'हे पतित पावन ये' अशी आळवणी केली आणि

आता परमपिता परमात्मा शिव या सृष्टीवर आलेत, तोच हा काळ त्याला श्रेष्ठ 'पुरुषोत्तम संगमयुग' म्हटले जाते. स्वतः परमपिता परमात्मा शिव प्रजापिता ब्रह्मांच्या तनाद्वारे राजयोगाचा अभ्यास शिकवून खऱ्या अर्थाने या सर्व बंधनातून मनुष्यात्म्यांना मुक्त करत आहेत. जे बंधन त्रासदायक, कष्टकारक आहे त्यातून मुक्त करून परमात्मा ईश्वरी बंधनात म्हणजेच ईश्वरी संबंधात बांधतात. त्याचा पाया आहे पवित्रता, केवळ शारीरिक ब्रह्मचर्य नाही. तर मन, बुद्धी, वाचा कर्मणा, व्यवहार, संस्कार, आचरण या सर्वात स्वच्छता हवी. आणि ही सर्व स्वच्छता, पवित्रता, स्नेह मिळतो तो परमपिता परमात्मा यांच्या ईश्वरी बंधनात म्हणून हे बंधन नसून पवित्र स्नेहसंबंध आहे. त्यात प्रेम, सुख, शांती, आनंद, शक्ती, ज्ञान याचा खजिना आहे. ते ईश्वरी बंधन आहे. त्यात स्वातंत्र्य व सुरक्षिततेची हमी आहे. ह्या काळात सर्वप्रकारचे रक्षण कोणी व्यक्ती करू शकत नाही, तर एक परमपिता परमात्माच करू शकतात, कारण तेच सर्वशक्तिवान व सर्व गुणांचे सागर आहेत. म्हणून तर ईश्वरी प्रेमाचे बंधन सर्वांना आवडते. ह्या बंधनांचे तर भक्ती मार्गात अनेक दाखले आहेत.

चला तर, मग आपणही 'रक्षाबंधनाचा' सत्य आध्यात्मिक अर्थ समजावून घेतल्यानंतर त्या परमात्म्यांच्या सर्वश्रेष्ठ ईश्वरी बंधनात बद्ध होऊन खरे रक्षा सूत्र बांधूया व सर्वांप्रति पवित्र, स्वच्छ दृष्टी, वृत्ती ठेवून सर्व माझ्या भगिनी आहेत ही भावना सतत मनात ठेवूया. आपण सर्व एकाच परमात्म्याची मुले आहोत हे सदैव लक्षात ठेवून स्वतः प्रती व सर्व मनुष्य आत्म्यांसाठी आत्मिक प्रेमाचे खरे खुरे बंधन बांधून घेऊया !

***

(पृष्ठ क्र. २ वरून)

दुखावले जाणार नाही ही दक्षतादेखील घ्यायची होती. दादीजी तिथे पोहोचल्या आणि त्यांनी घोषित केले, आज पोहण्याचा आनंद कोण कोण घेऊ इच्छित आहे? अनेकजण तयार झाले. ज्यांनी त्याबाबत तक्रार केली होती ते मात्र गोंधळून गेले. मनसोक्त पोहल्यानंतर दादीजींनी सर्वांना संध्याकाळी क्लासमध्ये बोलावले आणि खाऊदेखील दिला. नंतर बोलायला सुरुवात केली. दादीजी म्हणाल्या, ''हा तलाव आपण सगळ्यांनी मिळून निर्माण केला. ह्याचे प्रयोजन काय होते आणि आपण कशासाठी वापरायला लागलो आहोत? ह्यातून काही अपघात झाला तर हे सगळे किती महागात पडेल? याविषयी विचार करून पहा!'' असे प्रेमळ आवाहन केल्यावर मनात जागृती निर्माण झाली आणि सर्वानुमते या नियमाचा सहज स्वीकार झाला. योग्याचा स्वतःच्या कर्मेन्द्रियांवर अधिकार असतो म्हणून त्याचे म्हणणे इतरांना सहज स्वीकारावेसे वाटणे हे आध्यात्मिक रहस्य आहे. दादीजींच्या जीवनातून ते प्रखरपणे जाणवत राहते.


**इ) जबाबदारी निभावताना बारीक सारीक गोष्टीत लक्ष देणे सोपे नसते.** एखाद्या गोष्टीतली उणीव जाणवणे आणि ती तात्काळ दूर करणे, प्रत्येक वेळेस सोपे नसते. एकदा असे झाले – आपल्या देशातील थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्र.कु. संस्थेच्या आबू मुख्यालयाच्या भेटीस आले होते. संपूर्ण दिवस दादीजी आणि इतर साधकांसोबत घालवत असताना कलामसाहेब भोजन घ्यावयास बसले. इतक्यात त्यांना दिल्लीहून फोन आला म्हणून ते बोलण्याकरिता उठले. तो काळ मोबाइलचा नव्हता. दोनदा फोन आल्यामुळे जेवणातून त्यांना उठावे लागले. कलामसाहेब अति नम्र वागत, त्यामुळे ते म्हणाले 'क्षमस्व!' मला काही महत्त्वाच्या कामामुळे न टाळता येणारे फोन कॉल घ्यायला उठावे लागले. साधकाकडे जाणतेपण असावे असे समर्थ रामदास सांगून गेलेत. चाणाक्ष दादीजींनी प्रसंगातील पेच ओळखून कॉर्डलेस फोनची व्यवस्था तात्काळ करविली आणि सर्वांनाच त्याचे कौतुक वाटले.

अशा अनेक प्रसंगातून दादीजींचा निर्मळ स्वभाव आणि सहृदय नेतृत्व कायमच यशाची चढती कमान गाठत गेले. २५ ऑगस्ट २००७ रोजी दादीजी नश्वर देह त्यागून पुढील प्रवासाकरिता मार्गस्थ झाल्या. त्यांच्या स्मृतीस शतशः नमन!

***

## पाणी

आजोबांनी पाहिले नदीमध्ये, वडिलांनी पाहिले ते विहिरीमध्ये। आपण पाहतोय नळामध्ये, आपली मुले पाहतील बाटलीमध्ये। नातवंडे पाहतील ते कॅप्सूलमध्ये ......जर आता ही ह्याकडे दुर्लक्ष कराल, तर ते आपण पाहू शकू फक्त अश्रूंमध्येच।



# यज्ञेतिहासाची पाने पलटताना

**ब्र.कु. जयंती दीदी, लंडन**

जोपर्यंत आपण जीव्हारस घेणे बंद नाही केले, त्यावर विजय मिळवला नाही, तोपर्यंत आपल्या बुद्धिला अनेक गोष्टी खेचू शकतात. त्यासाठी मी एक गोष्ट सांगते. यज्ञाच्या सुरुवातीला यज्ञात एक माता होती. तुम्हा सर्वांना माहीतच आहे यज्ञाच्या इतिहासात बाबांनी सर्वांना सांगितले होते की ढोढा आणि लस्सी (भाकरी आणि ताक) सर्वांना हेच भोजन मिळेल, एका आठवड्यासाठी. पण बाबा अती दयाळू असल्याने अतीवात्सल्यापोटी ते म्हणाले, 'जर कुणी आजारी असेल, त्यांना जर हे खाणे जात नसेल तर त्यांनी आधीच तसे सांगावे, त्याप्रमाणे त्यांच्यासाठी वेगळी उपाय योजना (भोजनाची) आम्ही करू!' दोघे जण आजारी होते, तरीही त्यांनी म्हटले, 'ही तर प्रत्यक्ष बाबांची आज्ञा आहे आम्ही त्यांच्या आज्ञेचे पालन नक्कीच करू!' काहींना वाटले, 'आपण हे करू नाही शकणार', तर अशांसाठी वेगळे भोजन शिजायचे. त्यातच ही एक माता होती. पण ती काही आजारी वगैरे नव्हती पण ती 'सवयीचा गुलाम' म्हणतात त्यापैकी. तर असो, तिचेही नाव वेगळ्या भोजन यादीत होते.

मग कालांतराने यज्ञ कराचीहून आबू येथे आला. त्यावेळी आर्थिक चणचणीचा काळ चालू होता. त्यामुळे यज्ञातील अनेकांना त्यांच्या कुटुंबाच्या लोकांनी परत बोलवून घेतले. त्यात बऱ्याच माता, भगिनी होत्या. ज्यांचे मन थोडे डळमळीत व्हायचे, ते बाबांकडे जाऊन सांगत, 'बाबा, अमक्याने बोलविले आहे, मी घरी जात आहे!' त्यावर बाबा त्यांना हसून आशीर्वचन देऊन निरोप देत. त्यांच्यासाठी यज्ञाचा दरवाजा उघडा असे. यावरूनच बाबांना कळायचे कोण किती निश्चय बुद्धी आहे ते! निश्चयबुद्धी मुले म्हणत, 'बाबा भेटले यातच आम्हाला सर्व काही मिळाले. आम्ही तर प्रत्येक प्रसंगात त्यांच्या बरोबरच राहू. आम्ही लौकिक जगात पाऊलही ठेवणार नाही.' बाबा त्यांची परीक्षा घेण्यासाठी म्हणत, 'बघा, तुम्ही जाल तर तुम्हाला घरी आराम मिळेल, औषध-पाणी मिळेल. इथे तर तुम्हाला काहीच मिळत नाहीये.' पण निश्चयबुद्धी मुले म्हणत, 'नको बाबा, तुम्ही आमच्या बरोबर आहात आम्हाला अजून काय हवे!' आम्ही इथे खूप सुखी आहोत! तर अशी मुले बाबांबरोबर राहत.

पण काही लोक लौकिकात परत गेले, त्यातच ही माता होती. सुरुवातीला ती आपल्या नातेवाईकांकडे मुंबईला त्यांच्या बरोबर राहिली. त्या काळात तिने यज्ञाशी कुठल्याही प्रकारचा संपर्क ठेवला नाही. नंतर कळले काही महिन्यांतच तिच्या नातेवाईकांनी तिला वेगळ्या इमारतीत घर घेऊन तिथे राहायला पाठवले. तिथे ती एकटीच राहत असे. आता तिला अधिक स्वातंत्र्य मिळाल्याने ती हवे तसे जगू लागली. स्वतःच्या आवडीचे भोजन खायची. तिचा अंतकाळ जवळ आला, तसा त्या काळात तिला अती तीव्र इच्छा झाली, 'मला पाणी पुरी खायची आहे.' आता तिला कोण बनवून खाऊ घालणार! मग तिला सांभाळणाऱ्या कामवाल्या मुलीला तिने बाहेरून पाणी पुरी आणण्यास सांगितली. तशी त्या मुलीने आणली. तिने पाणी पुरी खाल्ली आणि तात्काळ तीची प्राणज्योत मावळली. हे सर्व तिच्या घरच्यांना खूप वेळाने कळले. यज्ञात तर हे कुणालाच माहीत नव्हते. अनेक वर्षांनंतर हे सर्व यज्ञातील लोकांना कळले. म्हणजे बघा जीव्हारस कशाप्रकारे त्या मातेला यज्ञातून खेचून लौकिक जगात घेऊन गेला. जीव्हारसाने जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तिला सोडले नाही. त्याची परिणती काय झाली? तर त्या मातेच्या नावाने नैवेद्य दाखवणारे कुणीच उरले नाही. ना तिचे नातेवाईक ना यज्ञातील साधक.

(पृष्ठ क्र. १३ वर)




# आरोग्य रहस्य

वैद्य सुविनय दामले, कुडाळ

**शरीरमाद्यं खलु धर्मसाधन्' या न्यायानुसार शरीरस्वास्थ्य ठीक राहणे हे अध्यात्म साधनेत अति आवश्यक आहे. त्याकरिता काही वेचक आणि वेधक टीपा या लेखमालेद्वारे देत आहोत. वाचकांना लाभ होत राहो हीच कामना – संपादक**

**आ. घातक रसायने**

अन्नावरचे संस्कार अन्नाचे गुण बदलून टाकतात. मक्याचे दाणे खायचे असतील तर, त्याअगोदर कणीस स्वच्छ तर करायला हवे. त्याच्यावरची आवरणे आणि तूस काढून टाकायला नकोत का?

तस्संच अन्नाचंही आहे. आपल्याला जसं हवंय तसं आपण शुद्ध करून घेतो. वरून खाली पोटात ढकललं की आपली जबाबदारी संपली. मग शरीराला जसं हवं तसं शरीर ते शुद्ध करून घेतं. ही सर्व जबाबदारी यकृतावर असते.

वरून खाली आलेल्या अन्नातील भेसळ दूर करणे, त्यातील विषावर तात्पुरते आवरण घालून बाजूला करणे, चांगले अन्न पचनासाठी पाठवणे, हे पाचन होण्यासाठी जे अन्नरस आवश्यक आहेत ते पुरवणे, नकोत ते पुन्हा शुद्ध करून घेणे, तयार झालेल्या अन्नरसातून रक्तनिर्मितीला आवश्यक ती तयारी करणे, तयार रक्तातील दोष शोधून ते मूत्र, मल, घामाद्वारे बाहेर काढणे इ. सर्व कामे यकृतच करीत असते.

पुरवून पुरवून वापरणे, अत्यंत आवश्यक तेवढेच आणि तेव्हाच नवीन उत्पादन करणे, नाही तर टाकाऊतून टिकाऊ तयार करणे हा यकृताचा आवडीचा छंद! आपण जेवढे शुद्ध अन्न आतमध्ये देऊ तेवढे यकृताचे काम कमी होते, त्याला पुरेशी विश्रांती मिळते. काम करून दमल्यानंतर परत ताजेतवाने होऊ शकते, एकदम फ्रेश!

नाहीतर हे यकृत कामाच्या ओझ्याखाली एवढे दबून जाते की स्वतःच्या मूलभूत गरजांकडेदेखील त्याला लक्ष देता येत नाही. अगदी एखाद्या राबराब राबणाऱ्या आदर्श गृहिणीसारखे. मग कधीतरी ठिणगी उडली आणि स्फोट झाला तर दोष कुणाचा?

**'सावध तो सुखी'** अशी आपल्याकडे एक म्हण आहे. वेळीच घातलेला एक टाका पुढील नऊ टाके वाचवतो, असे पाश्चात्य तज्ज्ञ देखील म्हणतात.

यकृताकडे आतून लक्ष देणे म्हणजेच घातक रसायनांपासून दूर राहणे. आज एवढी विषे आपल्या अवती भवती आहेत, त्यातून आपली सुटका करून घ्यायची असेल तर 'विवेकाने' वागले पाहिजे.

'एकतर टोटल प्रिव्हेंशन, नाही तर टोटल क्युअर'

काय योग्य काय अयोग्य हे वेळीच ठरवता आले पाहिजे. अनावश्यक विषे टाळू शकलो तर आवश्यक ती विश्रांती आपण आपल्याच यकृत, मूत्रपिंडे या अवयवांना देणार आहोत.

हलाहल पोटात गेले तर, पुढे धोका आहे, हे वेळीच ओळखून, ते विष योग्य त्या ठिकाणी रोखून, शोषून कंठामध्येच धारण करणारे नीलकंठ, हलाहलधर व्हावे.

हे झाले टोटल प्रिव्हेंशन आणि टोटल क्युअर, करायचे असेल तर??

वेळप्रसंगी प्रजेचे रक्षण झालेच पाहिजे हा उदात्त हेतू लक्षात घेऊन, यमुनेतील कालियाच्या विषारी डोहात उतरून, जमीन, पाणी आणि आसमंतामध्ये विष निर्माण करणाऱ्या, या कालियाच्या डोक्यावर थयथय नाचून रक्त ओकेपर्यंत नामोहरम करून, त्याला त्याच्याच डोहातून सोडून जाईपर्यंत पाठपुरावा करणारा गोपालक, कालियामर्दक बालकृष्ण तरी व्हायला हवे.

***



# ईश्वराच्या सांगाती : लच्छू दादीजी !

**ब्र.कु. हेमंत, शांतिवन**

प्रभूप्राप्तीसाठी ऋषी-मुनींनी किती व्रत-जप-तप केले, कठोर तपस्या केली, तरीही परमात्म प्राप्ती झाली नाही, तेव्हा ते नेती नेती म्हणाले! परंतु ज्यांनी प्रजापिता ब्रह्माबाबांच्या देहात निराकार शिवाला साकार रुपात पाहिलं ते धन्य धन्य झाले! ज्यांनी पिताश्री ब्रह्माबाबा द्वारे ईश-प्रेमाचा अमृतप्याला प्यायला! अशा सौभाग्यशाली प्रभुप्रेमींपैकी एक अद्वितीय प्रभुरत्न, साकार ब्रह्माबाबांमधे भगवंताचे सानिध्य अनुभवणाऱ्या, ईश्वराच्या खऱ्या सांगाती होत्या. 'ब्रह्माकुमारी लच्छू दादीजी! भागीरथ ब्रह्मातनात अवतरित शिवाची दिव्यकर्तव्ये आणि आदिदेव ब्रह्माबाबांच्या प्रत्येक श्रेष्ठ कर्माच्या एकमात्र साक्षी व साथी बनण्याचं दुर्लभ भाग्य प्राप्त झालं होतं लच्छू दादींना! अति जवळून शिवलीला पाहणाऱ्या लच्छू दादी मोठ्या आनंदाने म्हणत, 'स्वतः भगवंत ज्या भागीरथात आले, मला त्या भागीरथाला सांभाळायची भूमिका मिळाली.' बाल्यकालापासूनच ब्राह्ममुहूर्त ते रात्री नीद्रावस्थेपर्यंत, प्रत्येक क्षणी ब्रह्माबाबांची सावली बनून त्यांच्या सोबत राहणाऱ्या लच्छू दादी अंतःकरणात एकच गीत गात असत, 'तुम संग बैठू, तुम संग खेलू, तुम संग खांऊ, तुम संग रास रचाऊ, तुम को दिल का हाल सुनाऊ..'

दादींचा जन्म हैद्राबाद सिंध मधे ८ फेब्रुवारी १९३० रोजी झाला. पिता 'दयालदास थदानी ' व माता 'कमला' यांनी ह्या भाग्यवान कन्यारत्नास सुंदरसं नाव दिलं 'लक्ष्मी!' तर यज्ञात समर्पित झाल्यावर शिवपित्याने दादींना अव्यक्त नाम दिलं, 'हृदयइन्द्रा!' ब्रह्माबाबा दादींना कधी 'लच्छू किंवा लच्छी बच्ची' तर कधी 'लच्छूलाल' नावाने संबोधत. दादींचे एक विलक्षण वैशिष्ट्य होते अचूकपणा, बाबांना कोणतही काम अचूक केलेले आवडत असे. दादी प्रत्येक काम अचूक करत असत, ह्याच खुबीमुळे लच्छू दादींचा ब्रह्माबाबांसोबत अति महत्वपूर्ण अलौकिक असा पार्ट होता. दादींनी बालपणापासूनच आदिदेव पिताश्री ब्रह्माबाबा, आदिदेवी माँ जगदम्बा, दीदी-दादी आणि श्रेष्ठ यज्ञरत्नांच्या श्रेष्ठ संगाचं सौभाग्य प्राप्त केलं. लच्छू दादीजी कुशलतेने विधीपूर्वक यज्ञ कार्यव्यवहार करत व दिवस-रात्र अथक सेवा करुनही खूपच गुप्त, शांत व हलक्या राहत. दादींना जी सेवा मिळो, विधिपूर्वक करे पर्यंत त्यांना चैन पडत नसे.

आता जाणून घेऊया, लच्छू दादींच्या बालपणाची कहाणी, त्या सांगत, 'मला आठवते, जेव्हा मी पाच वर्षाची होते आणि बाल्कनीत खेळत होते, तेव्हा अचानक माझा पाय घसरला व मी ग्रील मधून सरळ खाली पडले, तेव्हा मी पाहिलं, खाली एक भाऊ उभा होता, मी त्याच्या अंगावर पडले, तोही खाली पडला, माझे पाय थोडेसे जमिनीला टेकले व पाय थोडा मुरगळला, खरंच मला दयाळू-मायाळू बाबांनीच वाचवलं !

मी लहान असताना ओम मंडळीत सतसंग होत असे. ओम मण्डळीत संध्याकाळी ओमध्वनी करत असत, तेव्हा माता देहभान विसरुन ध्यानावस्थेत जात असत. तिथे माझी आई सत्संगात जात असे. तेव्हा आम्ही लहान मुलं आईच्या मागे मागे, आईला पकडून जात असू. मला बाबा फार आवडत, बाबा जिथे जात, मी बाबांच्या जवळ जाऊन बसत असे. मी हेच समजत असे की ब्रह्माबाबाच माझे लौकिक पिता आहेत. तेव्हापासून मला बाबांचा लळा लागला. बाबा काश्मिरला गेले होते. तिथे बाबांना मुलांसाठी बोर्डिंग उघडायची प्रेरणा मिळाली. बाबांनी आपल्या मुलांसाठी एक बिल्डिंग बांधली होती, त्यात दिवाळीच्या शुभदिनी बोर्डिंग उघडली. बाबा मुलांना म्हणाले, 'तुम्ही आपल्या आई-वडिलांकडून लिहून आणा- 'ह्या रुहानी बोर्डिंग मधे आम्ही स्वखुशीने

तसेच मुलांच्या मर्जीने शिक्षण घेण्यासाठी परवानगी देत आहोत.' माझ्या मातापित्याने माझी मोठी बहीण 'ईशु दादी' व मला आनंदाने परवानगी दिली, मग दिवाळीपासून आम्ही दोन्ही बहिणी बोर्डिंगमधे राहू लागलो.

बाबा बोर्डिंगमधे आम्हास मोठ्या लाडाने राजकुमारी सारखे संगोपन देत. आम्ही जवळ-जवळ ८० मुलं होतो. त्यात पाच-सहा कुमार व बाकी सर्व कुमारी होत्या. तिथे आम्हाला लौकिक व अलौकिक संगोपन दिले जात असे. प्रातःकाल ते रात्री पर्यंत आमची दिनचर्या अशा प्रकारे होती - पहाटे पाच वाजता 'जाग सजनीया जाग...' ह्या गीताने आमची पहाट होत असे. पाच दादी व पाच मातांद्वारे आमचे आध्यात्मिक व लौकिक संगोपन होत असे. सकाळी तोंड हात धुऊन, दूध बदाम खाल्यावर आम्ही बागेत भ्रमंतीसाठी जायचो. व्यायाम व खेळ खेळून परत आल्यावर मातांद्वारे तेलमालिश व स्नान होत असे. मग न्याहारी करुन शाळेत जायचो, तिथे आम्हाला आध्यात्मिक विद्येसोबत बाह्यजगातील शिक्षणही दिलं जाई. दोन तास आमची शाळा भरत असे, तिथे खूप सोप्या पद्धतीने ज्ञान समजावून सांगत असत. शाळा सुटल्यानंतर दादींसोबत जेवण करुन थोडी विश्रांती घेतल्यावर, आम्ही संध्याकाळी इनडोर गेम उदा. कॅरम बोर्ड, दोरीची उडी, लूडो आणि बैडमिंटन खेळत असू. मिट्ठू दादी आम्हाला गायला शिकवायच्या. मुलं कसं गातात ते बाबा येऊन ऐकत असत!

रात्री अंगणात बसून सर्व भोजन करायचो. बाबा सर्वांची विचारपूस करत, मुलं ठीक आहेत ना, कुणाला कसला त्रास वगैरे तर होत नाही ना? अशा प्रकारे बाबा आमच्या बरोबर गप्पा मारत. त्यांनतर रात्री सर्व झोपायला जात असत, तेव्हा आमच्या पलंगावर मच्छरदाणी लावलेली असे. बाबा सर्वांना रांगेत दृष्टी देत व गीत सुरु होई, 'सो जा, राजकुमारी सो जा..' तेव्हा सर्व झोपी जात. बाबांच्या संगोपनामुळे सर्व स्वस्थ राहत असत. स्कूल ड्रेस वर धाग्याने ओम बनवलेला असे. शाळेत कुणी वी.आय. पी.(अति महत्वपूर्ण व्यक्ति) आला तर त्यांच्या समोर आम्ही एक नाटक करायचो, त्यात भोला भाई व ब्रह्माकुमारीचा डायलॉग होता. ब्रह्माकुमारी भोला भाईला विचारत असे, 'आपण कोण आहात?' भोलाभाई शरीराच नावं सांगे, तेव्हा ब्रह्माकुमारी म्हणायची, 'नाही, आपण आत्मा आहात' अशा प्रकारे ब्रह्माकुमारी आत्म्याचं ज्ञान देत असे, तेव्हा पाहुणे खुश होऊन म्हणत कौतुक करत मुलांना बोर्डिंगमधे चांगलं शिक्षण दिलं जातयं. ह्या नाटकात गुलजार दादी व मी (लच्छू दादींनी) भाग घेतला होता.

मी पिताश्रीं सोबतच राहायचे. बाबा दोन-अडीच वाजता जागे होत आणि मी मात्र निद्रावस्थेत असले, तर हा जणू बाबांचा डिसरिगार्डच होईल ना! तेव्हा मी मनात दृढ संकल्प केला की बाबा जागे झाले की मी पण बाबां सोबत जागे होईन, हा मी पक्का निश्चय केला. बाबा जसं त्यांच्या खाटेवरुन खाली पाय ठेवायचे तशी मी पटकन जागी व्हायची आणि उठून बसायची. बाबा म्हणत, 'मुठ्ठी, मी इतकं हळूच उठलो तरीही तू जागी झाली.' मी पहायची बाबा अंगणात जाऊन बसत, त्या वेळी बाबांच रुप इतकं शक्तीशाली असे की त्यांच्या समोर जायची कुणी ही हिम्मत करु शकत नसे. त्या वेळी बाबा साऱ्या विश्वाला आध्यात्मिक प्रकंपन देत. विशेष करून बद्ध मातांना शक्ती देत. बद्ध मातांची पत्रे येत बाबा अमुक रात्री हा अनुभव झाला आम्ही बाबांना भेटलो. बद्ध माता, बाबांबरोबर मिलनचा अनुभव करत.

बाबांनी वर्तमानपत्रात पोप भारतभेटीस येण्याची बातमी वाचली लगेच बाबांचा विचार सुरु झाला आता ह्यांना परमात्म संदेश कसा देऊ? बाबा अमृतवेळेला लिहीत व माझ्याकडून लिहिलेलं पक्कं फेअर करवत, मग नंतर दुरुस्ती करत. नंतर बाबा दूध पिऊन क्लास मधे जात, मी बाबांसाठी छोट्या-छोट्या रोटी (चपात्या) बनवून त्यावर मध व लोणी लावून बाबांना देत असे, बाबा आधी शिवबाबांची आठवण करत आणि पहिला घास मला खाऊ घालत, मग स्वतः खात. यज्ञात आर्थिक चणचणीच्या वेळी आम्ही चपाती वर गुळाचा पाक लावून खात असू. बाबांची स्थिति पूर्णत्वाकडे जात होती, मी पाहिलं दिवसें दिवस बाबा अलिप्त होत आहेत. विश्वकिशोर भाऊंचे मुंबईत ऑपरेशन होतं व बाबा इथे बसून त्यांना योगदान देत होते. बाबांनी देह त्याग केला, तेव्हा माझी स्थिती ठीक होती, कारण बाबांनी बालपणीच दैवी गुण भरले होते व पक्कं केलं होतं कधी खोटं बोलायचं नाही व कधी रडायचं नाही. बाबा म्हणत, 'अम्मा मरें तो भी हलवा खाओ,' म्हणून बाबा अव्यक्त झाल्यावर मी डोळ्यात अश्रू येऊ दिले नाहीत.'

यज्ञाच्या आरंभी बाबांनी पुरुषार्थासाठी ग्रुप बनवले होते. त्यात

एक ग्रुप होता 'रमा पार्टी' म्हणजे प्रकाशमणी दादींचा ग्रुप होता, त्या ग्रुपमधे लच्छू दादीही होत्या. पुरुषार्थाबरोबर लच्छू दादीजी ग्रुपला भोजन बनविण्यात मदत करत असत. दादी प्रकाशमणी ग्रुपच्या टीचर आणि केअर टेकरही होत्या. लच्छू दादी वांग्याची भाजी व सेलमानी बनविण्यात खूपच प्रवीण होत्या. सुरुवातीला ब्रह्माबाबांनी जेव्हा कल्पवृक्ष आणि त्रिमूर्ति ही चित्रं बनवली, तेव्हा विश्वरतन दादा व इतर बहिणीं सोबत लच्छू दादीही रात्र-रात्र जागून चित्र बनविण्यात मदत करत असत. कधी बाबांनी ज्ञान मुरलीत फुलांचं वर्णन केलेलं असेल तर दादी बागेतून फूल तोडून क्लास मधे आणून सर्वांना दाखवत.

भारत पाक विभाजनानंतर ५/५/१९५० रोजी यज्ञ कराचीहून भारत आबू पर्वत ब्रीज कोठी मधे स्थानांतरित झाला. नंतर ब्रीज कोठीहून यज्ञ कोटा हाऊस (राजस्थान सर्किट हॉऊस) मधे स्थानांतरित झाला. त्यानंतर यज्ञ पोकरण हाऊस (वर्तमान पाण्डव भवन) मधे आला. आरंभी बृजेंद्रा दादी व संतरी दादी ब्रह्माबाबांची देखभाल करत, कोटा हॉऊस मधे आल्यावर लच्छु दादींना ही जबाबदादी दिली गेली. बाबांचे कपडे, बाबांची खोली व्यवस्थित ठेवणे, आल्या-गेल्यांसाठी खाऊ व फळं आयोजित करणे, बाबांचं भोजन काय बनेल? हेही लच्छू दादीच ठरवत होत्या. लच्छू दादी ब्रह्माबाबांच्या एक प्रकारे ब्राह्मणी (सेवासाथी) होत्या. साकार बाबा अव्यक्त झाल्यावर लच्छू दादी मनमोहिनी दीदींच्या ब्राह्मणी बनल्या. लच्छू दादी दीदींची प्रत्येक सेवा फार प्रेमाने करत. दीदींची डायरी-पेन, दीदी क्लास मधे जायच्या १० मिनिट आधीच दीदींच्या क्लास मधे बसायच्या जागेवर ठेवून येत.

सन १९८१ मधे लच्छु दादींना प्रकाशमणी दादीं सोबत विदेश सेवेची स्वर्णिम संधी ही प्राप्त झाली. विदेश सेवा करुन परत आल्यावर लच्छु दादींच्या प्रति अव्यक्त बापदादा वदले, 'ही पण (लच्छू दादी ही) विदेशाची यात्रा करुन आलीय. हिनेदेखील तपस्या केलीयं ना! ही पण लक्की (भाग्यवान) आहे, ही बालपणापासूनच श्रेष्ठ संगात राहिलीयं. असं भाग्य सर्वांचं नसतं. आता विदेश सेवेच्या दौऱ्याची परतफेड करायला काय करणार? आता प्रैक्टिस कर, क्लास करायची प्रैक्टिस कर. खूप डायरेक्ट ऐकलयं ना! जे नखात लपवून ठेवणारी बाब (गोपनीय गोष्ट), ती पण ऐकलेली आहे, त्याची परतफेड करायची आहे ना! अच्छा, सर्विसएबल मुलं जिथे जातात, सर्विसची परतफेड जरुर देतात.'

लच्छू दादींपाशी अनेक सेवांच्या जबाबदाऱ्या होत्या, जसं - १) प्रत्येक सद्गुरुवारी नैवेद्य विधिपूर्वक सजवणे, तयार करणे व घेऊन जाणे २) अमृत बनवणे ३) दादींना भोजन देणे, ४) सिन्धीत मुरली लिहिणं, करेक्शन करणं व वाटणं अक्षर खूप सुंदर आणि सुवाच्च होतं अगदी मोत्याचे दाणेच ५) स्टोर ६) पायाचे बूट, चप्पल व छत्र्यांचे स्टोअर, ७) ड्रायफ्रूटचे स्टोअर, ८) साकार बाबांची प्रत्येक वस्तू सांभाळून ठेवणं, जसं ब्रह्माबाबांचं धोतर, सदरा, बनियान, ड्रेस, स्वेटर इत्यादि, ९) साकार बाबांची डायरी, चौपड, सर्वात छोटी गीता, तांदळाच्या दाण्यावरचा हत्ती, लाल पेन्सिल, लेटर पॅड, बाबांनी लिहीलेली पत्रं, चौपड, राम-रावण सीतेचे मैग्नेटिक खेळणं इत्यादी.. दादी प्रत्येक वस्तु जपून ठेवत व विदेशी भाऊ-बहिणींना दाखवत. यज्ञातील वस्तुंची नासधूस होऊ नये, ह्यावर दादी खूप लक्ष देत. दादींचे काटकसरीचे संस्कार होते.

लच्छू दादींचे एक खास वैशिष्ट्य होते मधुबन, म्युझियम, ज्ञानसरोवर, शांतिवन, संगमभवन, ग्लोबल हॉस्पिटल आणि पीसपार्क मधे प्रोग्राम असेल आणि तेथून दादींना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले असेल किंवा तिथे जायची दादींना संधी मिळाली, तर दादी कधीच तो प्रोग्राम मिस करत नसत. लच्छू दादी नेहमी म्हणत, 'कोणताही सीन (दृश्य) मिस करु नये. ड्रामा मधील नोंदी कल्प-कल्प आपल्यात रेकॉर्ड करा.' म्हणूनच दादी न चुकता प्रत्येक ठिकाणी पोहचून कार्यक्रमात हजर राहत.

मज आत्म्यासही दादींच्या प्रेमळ सहवासाचे सौभाग्य लाभले. लच्छू दादींचे बाबा व यज्ञ सेवेवर जिवापाड प्रेम होत. मी लच्छू दादींमधे आळस, ढिसाळपणा आणि बहाणेबाजी कधीच पाहिले नाहीं. बालसुमनासारखं निरागसपण, नम्र-निरंहकारी बनून सदैव प्रत्येक सेवेत 'हां जी' चा पाठ पक्का असलेल्या लच्छू दादी, दिवस असो वा रात्र, प्रत्येक सेवेत नेहमी तत्पर राहत. मातेश्वरी निवास मधे मी रॉक गार्डन बनवली होती, तो सर्वात आधी गुल्जार दादींनी पाहिली. नंतर लच्छू दादींनी खूप प्रेमपूर्वक निमंत्रण देऊन दादी जानकी व निर्मलशांता दादींना रॉक गार्डन दाखवून माझं मनोबल वाढवलं. मी मधुबन मधे समर्पित झालो तेव्हा

लहान होतो. मी एखादं चित्र काढलं किंवा प्लास्टिक फूलांचा फ्लॉवरपॉट बनवला, तर लच्छू दादी प्रकाशमणी दादींपाशी मला नेत व त्यांना चित्र व फ्लावरपॉट दाखवत अन् प्रकाशमणी दादी मला शाबासकी देत. तेव्हा माझ्या आनंदाला पारावार राहत नसे. मी शांतिवनमधे आल्यावर सिंधी भाषा लिहीणं-वाचणं शिकलो, तेव्हा लच्छू दादी खूप प्रेमाने मला प्रत्येक शब्द अचूक लिहायला शिकवून माझा उत्साह वाढवत. प्रकाशमणि दादींसाठी लच्छू दादी मोत्यांसारख्या अक्षरात अव्यक्त मुरली लिहीत. अव्यक्त बापदादांच्या पधरामणीच्या वेळी दादीजी खूपच श्रध्दा भावनेने सुंदरपणे फळ कापत, खरं तर दादींचे प्रत्येक कर्मच कला होते.

दिृश भाई (टोली डिपार्टमेंट, पाण्डव भवन) लच्छू दादींची वैशिष्ट्ये सांगतात, 'लच्छू दादींमधे साधेपणाचा कमालीचा संस्कार होता, दादींचं राहणीमान साधं होतं. एक खाट, एक कपाट व छोट्याशा जागेतच दादींनी आख्खं आयुष्यं काढलं. बाबांच्या जेवणानंतरच दादी जेवत. पाण्डव भवनमधे प्रकाशमणी दादींच्या भोजनानंतरच लच्छूदादी भोजन करत. त्या नेहमी मोठ्यांचा आदर ठेवत. लहान स्टुलावर बसून छोट्या प्लेटमधे खात. मी म्हणालो, 'तुम्हाला टेबल बनवून देतो' तर दादींनी नकार दिला. दादी व्यायाम करत, दादी कधी आजारी पडत नसत, सदैव निरोगी असत. दादींनी जेव्हा शरीर सोडलं, तेव्हा त्यांच्या कपाटातून कपड्यांशिवाय कोणतीच वस्तू किंवा एक रुपयाही नव्हता. दादींना एखादी वस्तू मिळाली की ती प्रकाशमणी दादींना देत. एकदा ग्लोबल हॉस्पिटल मधे एक सुंदर सिल्वर ट्री (चांदीचं झाड) गिफ्ट मिळालं, ते दादींनी मला दिलं, मी मधुबन मधे येऊन दादींना ते गिफ्ट परत केलं. लच्छू दादींनी लगेच ते गिफ्ट प्रकाशमणी दादींना दिलं. मी म्हणालो, 'दादी, तुमच्या खोलीत सजवून ठेवा.' लच्छू दादी म्हणाल्या, 'मोठ्या दादींपाशी वी.आय.पी येतात, दादी त्यांना देऊन सेवा करतील ना !'

दादीजी खूपच निर्मोही-निर्लोभी होत्या, कुणाशी अटैचमेंट नव्हती. ईशु दादी मोठी बहीण होत्या, परंतु कधीही त्यांच्यात लौकिकतेचा भाव व भान कुणी पाहिले नाही. खूप वर्षापर्यंत मधुबन निवासींना माहीतच नव्हतं की दोन्ही दादीं लौकिक बहिणी आहेत. लच्छू दादींनी कधीच इशु दादींच्या पद प्रतिष्ठेचा फायदा घेतला नाही. सेवेत इतकी सफाई, इतक्या काटेकोर, साडे सात वाजता भोग घेऊन पोहचत. ७.३५ किंवा ७.४० ही होत नसत. सर्व दादींना विचारुन लच्छू दादींनी मला (दिनेश भाईला) भोगाची सेवा दिली. अमृत बनवणं शिकवलं व ट्रेनिंग दिले, मोठे फळं चारही बाजूंना व दाक्ष्यासारखे छोटे फळं प्लास्टिक मधे व चिकू मध्यभागी सजव. फूलांमधे कांटे, किडे असले किंवा फूल सडलेले असेल, तर त्याला बाहेर काढून, फूलं धूऊन प्लेटमधे सजव. एकदा दादी शांतीवनमधे होत्या. म्हणून मला गुरुवारी नैवेद्य दाखवायला सांगितलं. मी फूलांची प्लेट खाली रैकमधे ठेवली. दादींनी लगेच मला बोलावून दाखवलं, मी म्हणालो, 'दादी प्लेट वरती असायच्या ऐवजी खाली तर आहे ना,' दादींनी समजावलं, 'कुणी आंधळ्याने येऊन कपाट उघडलं तरी वस्तू तिथेच जागेवर मिळाली पाहिजे, दादी सेवेत इतक्या एक्यूरेट होत्या.

लच्छू दादींपाशी कित्येक डिपार्टमेंट होती, मी हसत म्हणालो, 'दादी तुमची इतकी डिपार्टमेंट आहेत, तेव्हा एक ऑफीस बनवू या. मी फाईल मेंटेन करेन, तुम्ही फक्त ऑफिसमधे बसा' दादी म्हणाल्या, 'मला गरज नाही, मी चालता-फिरता सेवा करेन, मला तत्पर राहायचयं.' दादींनी कोणतेच ऑफीस व गाडी मागितली नाही, त्यांनी इच्छा केली असती तर यज्ञातून मिळू शकत होती. दादींना कोणतीच इच्छा नव्हती, मी त्यांना सदैव 'इच्छा मात्रम् अविद्या स्थितीत पाहिलं. दादींचा ड्रेस एक सारखाच होता, दादींच्या धावपळीच्या सेवेमुळे बाबांनीच सलवार कुर्ता घालायची परवानगी दिली होती. दिवाळी किंवा मोठ्या प्रोग्राम असला तर जास्त चमकदार ड्रेस हवा, असं कधीच नाही. खरं तर, दादी स्वतःच्या आदर्श वागणुकीतून सर्वांना प्रेरणा देत. अशा अथक सेवाधारी लच्छु दादी शेवटपर्यंत सेवा करत राहिल्या. ८१ वर्षांच्या वयातही दादींनी कधीच कुणाद्वारे सेवा करवून घेतली नाही. एके दिवशी चालता-फिरता अचानक दादींची तब्येत बिघडली, तेव्हा त्यांना ग्लोबल हॉस्पिटल मधे नेलं. नंतर दादींना अहमदाबादला रेफर केलं, दुसऱ्या दिवशी १४ ऑगस्ट २०१३ रोजी अहमदाबाद मधे प्रातः ३ वाजून ४५ मिनिटांनी लच्छू दादी देहत्याग करुन बाबांच्या कुशीत सामावल्या.

***

# योग्य रस्ता गवसला

ब्र.कु. देवेन्द्र, मुलुंड, मुंबई



जगात प्रत्येक मनुष्याला आपल्या आयुष्यात कुठली न कुठली इच्छा असतेच. कुणाला खूप पैसे कमवायची, लखपती, करोडपती होण्याची, कुणाला खूप खूप शिकून मोठे व्हायचे असते, कुणाला बंगला, गाडी, नोकर–चाकर असण्याची, कुणाला नाम–मानाची. कुणाला प्रसिद्ध नट होण्याची कुणाला जगत्‌विख्यात क्रिकेटर बनण्याची, तर कुणाला बडा राजकीय नेता होण्याची. मनुष्याच्या अशा इच्छांना अंत ना पार म्हणजे मनुष्य अनेक प्रकारच्या इच्छापूर्तीसाठी आयुष्यभर झटत राहतो.

माझ्याही आयुष्यात अगदी लहानपणापासून एकच प्रबळ इच्छा होती. (त्यावेळी मी साधारण ८ व्या इयत्तेत शिकत होतो) मला ह्या भारताचे राष्ट्रपती व्हायचे होते, त्यासाठी मी तसे प्रयत्नही चालू केले होते. इतिहास आणि नागरिक शास्त्र या विषयांची मला फार आवड होती. त्या विषयांचा मी इतका अभ्यास केला होता की माझ्या शाळेतील सर्व शिक्षक मला राजकारणातील त्या संबंधित प्रश्न करीत. उदा. आपल्या देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान कोण, तसेच प्रत्येक विभागाचे, राज्याचे मंत्री त्यांची नावे, पदे सर्व मलाच विचारीत. हळूहळू त्या विषयात मी जास्तीत जास्त माहिती जमा करू लागलो. त्या अनुषंगाने जमेल तशी, जमेल तेव्हा वेळात वेळ काढून समाजसेवाही करायला लागलो. (शाळा संपल्यावर सामाजिक बांधिलकीसाठी समाज उपयोगी काम करायला सुरुवात केली.)

माझे मूळ गाव पाटण, मेहसाणा (उत्तर गुजरात) ह्या गावात आणि अन्य ठिकाणी बस सेवा (एस.टी.) सुरू करण्यासाठी मी नेटाने प्रयत्न केले. त्यात यशही आले, तसेच गावागावात धावणारी एस.टी. आता पक्क्या सडकेवरून धावत होती. त्यासाठी मी जिल्हा प्रशासन, राज्य सरकार यांच्या विरोधात अनेक आंदोलने केली, त्याचे नेतृत्वही कुशलतेने केले. वीज आणि पाणी प्रश्नासाठी सरकार दफ्तरी कितीतरी खेपा घालून, तेही प्रश्न निकालात लावण्यासाठी धडपडलो. त्यावेळी माझे वय फार लहान होते, तरीही मुख्यमंत्र्यांशी केलेल्या पत्र व्यवहाराचे उत्तर १०० पेक्षा अधिक वेळा आल्याचे स्मरते.

एकदा–एका गावात बस सेवा तर होती, पण ऐन पावसाळ्यात सरकार बस सेवा बंद करीत असे. तेथील ग्रामस्थांची तक्रार होती की, अनेक प्रयत्न करूनही सरकार त्यांना दाद देत नाही. पावसाळ्यात लहान मुलांचे, शाळेच्या शिक्षकांचे, फार हाल होत. भर पावसात बस सेवा नसल्याने चालत जावे लागे. त्यासाठी मी काय केले की गुजरात राज्य एस.टी.वाहन निगमच्या जिल्हा डेपो मॅनेजरना एक पत्र लिहिले, 'जर सरकारने ७ दिवसात बस सेवा सुरळीत केली नाही, तर ह्या गावाजवळील रस्त्यावरुन कुठलीही दुसरी बस जाऊ देणार नाही, सरकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणालाही बसेन. त्याचा परिणाम असा झाला की गावाजवळून जाणाऱ्या प्रत्येक बसच्या खिडक्यांवरील काचेवर लोखंडी जाळ्या बसवण्यात आल्या. जेणेकरून आम्हा आंदोलनकर्त्या गटाकडून बसेसना कोणतेही नुकसान होणार नाही. आम्ही तसे काही केले नाही. परंतु आठवड्याभरातच गावातील बस सेवा भर पावसातही सुरळीत चालू झाली.

एकदा मी आमच्या शेतात बैलांना पाणी पाजण्यासाठी नेत होतो. रस्त्यात एक कुत्रा झोपलेला होता. मी चुकून त्याच्यावर पाय दिला आणि तो माझ्या पायाला चावला. तुम्हाला तर माहिती आहे की त्याकाळी कुत्रा चावला की सरकारी दवाखान्याच्या फेऱ्या कराव्या लागत, १४ इंजेक्शन्ससाठी, माझ्या गावात सरकारी दवाखाना नव्हता म्हणून मग मी शेजारील गावात रोज सायकल वरून इंजेक्शनसाठी ये–जा करायचो. त्यावेळी सरकारी दवाखान्यातील

कर्मचारी इंजेक्शन दिले की माझ्याकडे पैसे मागत. मीही देई कारण ते इंजेक्शन घेणे फार गरजेचे होते. जेव्हा माझा १४ इंजेक्शन्सचा कोर्स पूर्ण झाला, त्या दिवशी मेडीकल ऑफीसर पुन्हा पैसे मागू लागला. त्या दिवशी मात्र मला खरोखरच राग आला. मग मीही सुनावले, हे सरकारी इस्पितळ आहे, तरी तुम्ही रोज रोज का पैसे घेता? तुम्ही एवढे पैसे खाता लोकांचे? त्यावर तो कर्मचारी फारच चिडला, रागाने त्याने मला (धक्का मारला) ढकलले आणि शिपायाला बोलावून म्हटले, 'अरे जा जा मी तर जातोच पण तुलाही घेऊन जाईन.' तो- जा जा तुझ्यासारखे खूप बघितले.'

मला कळले की हा माणूस आसपासच्या खेड्यापाड्यातून आलेल्या गरीबांकडून पैसे घेतो, त्यांनाही तंगवतो. तेव्हा मी राज्याच्या आरोग्य मंत्र्यांनाच थेट पत्र लिहिले. सांगितले की ह्या मेडिकल ऑफिसरला जोपर्यंत तुम्ही सस्पेंड करत नाहीत, तोपर्यंत मी तुमच्या ह्याच कार्यालयाबाहेर आमरण उपवासाला बसेन. त्याचा योग्य तोच परिणाम झाला. आरोग्य मंत्र्यांनी स्वतः जिल्ह्याच्या सिव्हील सर्जनना तारच पाठवून आदेश दिला की वरील गोष्टीची चौकशी करावी. त्यावर सिव्हील सर्जनने कार्यवाही करत मला अक्षरशः ४-४ टेलिग्राम केले. त्यात लिहिले होते की, 'आपण घटना स्थळी स्वतः हजर राहावे, मीही येतो.' खरंच तसे होऊन त्या भ्रष्टाचारी मेडिकल ऑफिसरला सस्पेंड केले गेले. लोकांना ह्या गोष्टीचा फार आनंद झाला.

अशाप्रकारे लोकसेवा करत करत मी फार थकून गेलो होतो. शारीरिक आणि मानसिक स्तरावरही सारखे मनात हाच विचार की मी बनेन तर राष्ट्रपती नाहीतर मला जगायचेच नाही. ह्यामुळे आयुष्य फार नीरस वाटायला लागले, चिंता, निराशा, दिवसेंदिवस वाढत होती. राष्ट्रपती बनायची इच्छा मनातून काढून टाकायचा अनेकदा प्रयत्न केला. पण ती अजूनच मनात घर करून राहिली. मला ह्या माझ्या इच्छेपासून परावृत्त करण्यासाठी माझ्या घरच्यांनी नाना प्रयत्न केले. मोठ्या मोठ्या शंकराचार्यांना, ज्योतिषांना मला भेटवले. पण सारेच व्यर्थ गेले. मी माझ्या इच्छेखातर कित्येकदा धड जेवायचो नाही, न रात्री झोपायचो. रात्री त्याच विचारांनी हैराण व्हायचो. घरचे ह्या प्रकारांनी अजूनच वैतागले होते. कारण माझ्या अनेक प्रकारच्या उपद्व्यापांपायी घरी पोलीसांचे येणे नित्याचे झाले होते. घरच्यांनाच उत्तरे द्यावी लागत.

माझे लौकिक आई-बाबा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय ह्या संस्थेचे सभासद होते. मग आई-बाबा मला सर्व (वरील) प्रकारांतून सोडवण्यासाठी संस्थेच्या मुख्यालयात माउंट आबू येथे घेऊन गेले. कारण मी त्यांच्या तोंडून बऱ्याचदा ऐकले होते की तिथे साक्षात् ईश्वराचे अवतरण होते. मीही विचार केला की चला बघू तर, खरंच जर ईश्वर येत असेल, तर तो माझी ही इच्छा नक्कीच पूर्ण करेल. माउंट आबू येथील पाण्डव भवनाच्या ओम् शांती भवनात मी जेव्हा पोहोचलो. तेव्हा मला दिसले की तिथे बरेच लोक माझ्यासारखेच ईश्वर मिलनासाठी उत्सुक होते. पूर्ण सभागृह खचाखच भरले होते. त्याकाळी ईश्वराला स्टेजवर भेटण्याची सर्वजणांनाच संधी मिळत असे. माझाही नंबर आला तेव्हा रात्रीचे दीड-दोन वाजले होते. त्यावेळी बाबांना (ईश्वराला येथे बाबा म्हणतात हे मला आत्ताच कळले होते.) हे सांगितले गेले की, 'ह्या मुलाला देशाचा राष्ट्रपती बनण्याचा फार संकल्प येतो, काय करावे?'

माझे मन अनेक विचारांनी गोंधळाने सैरभैर झालेले होते. पण ज्यावेळी बाबांशी (अव्यक्त बापदादा) दृष्टादृष्ट झाली, त्यावेळी त्या दिव्य दृष्टिने माझे मन एकदम शांत शांत झाले. पिसासारखे हलके झाल्यासारखे वाटू लागले. बाबांनी मला खूप वेळ शक्तिशाली दृष्टी दिली. त्यावेळेचे वर्णन शब्दात करणे जरी कठीण असले तरी असे वाटत होते माझ्या जन्मोजन्मीच्या सर्व इच्छा आकांक्षा, तहान-भूक सर्व काही शांत होत आहे. मी त्याच शक्तिशाली ईश्वरी तरंगात स्वतःला झोकून दिले. बाबा म्हणाले, 'उँच ते उँच ब्राह्मण आत्मा हो, श्रेष्ठ ते श्रेष्ठ (सर्वश्रेष्ठ) ब्राह्मण आत्मा हो। जानते हो क्या से क्या बन गये। इस सृष्टि चक्र में हीरो पार्टधारी आत्मा हो। पूरे विश्व की नजर में आनेवाली आत्मा हो। संपूर्ण विजयी रत्न हो, विजयी हो या नहीं यह सवाल ही नहीं उठता। ब्राह्मण परिवार में श्रेष्ठ ते श्रेष्ठ ब्राह्मण आत्मा हूँ ऐसा मुख से नहीं मन से बार बार रटतें रहो, तो यह राष्ट्रपती बनने का संकल्प मन से निकल जायेगा।'

सृष्टिचा निर्माता, जगन्नीयंता, शक्तीसागर, जगातील सर्वोच्च ॲथॉरिटी, सर्व समर्थ, प्रत्यक्ष परमेश्वराच्या तोंडून हे वरदानी बोल ऐकून तसेच त्यांना समोरासमोर भेटून माझे मन गद्‌गद झाले. त्याच वेळी मला

हेही पक्के झाले, की ही कुणी साधारण व्यक्ती नसून हा भारताचाच नव्हे, तर रशिया, अमेरिकेच्या राष्ट्रपतीपेक्षाही अत्युच्च सर्वश्रेष्ठ शक्तिसंपन्न साक्षात ईश्वरच आहे. आता माझे मन पूर्णपणे शांत झाले होते. मनातील विचार, कोलाहल पूर्णपणे थांबला होता. मनात नखशिखान्त एवढा आनंद दाटला होता की आनंद मनात माझ्या माईना... आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहीकडे... मन आनंदाने दुथडी भरून गात होते आणि बरं का हा आनंद इतका निर्भेळ होता की बहुधा खरोखरी राष्ट्रपती पद प्राप्त केल्यानंतरही जो आनंद मिळाला नसता. त्याहीपेक्षा कितीतरी हा आनंद मोठा होता. आयुष्यात पहिल्यांदाच असे होत होते. धन्य धन्य हो गये आज प्रभु को पा गये... हो! हे अगदी स्वप्नातल्यासारखे वाटत असले तरी ते खरे आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आम्ही स्वगृही मुंबईला परतलो. पाहतो तो घरी एक पत्र येऊन पडले होते. पंतप्रधान कार्यालय, नवी दिल्ली येथून थेट प्रधानमंत्री श्री चंद्रशेखर यांचे –

पण मी तर उडतच होतो प्रत्यक्ष परमेश्वराला भेटल्यानंतरचा आनंद शब्दातीत आहे. तो फक्त एखाद्याला अनुभवानेच कळेल. घरी परतल्यावर सर्वात आधी कोणते काम केले असेल, तर राष्ट्रपती बनण्यासाठी लहानपणापासून आजपावेतो केलेले सर्वच प्रयत्न मी एका फाईलमध्ये एकत्रित ठेवले होते. जनसेवेची केलेली कामे, त्यांचे रेकॉर्ड मोठ्या मोठ्या तीन बॉक्स फाईलमध्ये ठेवले होते. त्या सर्वांना एकत्र करून त्याची होळी पेटवली. आता मला फार फार हलके वाटायला लागले. मग मी त्या अवस्थेत सेंटर (सेवाकेन्द्र) ला जायला सुरुवात केली ते त्याच दिवसापासून. तसेच मी माझ्या अंतःकरणापासून सतत त्या निराकार परमात्मा पिता शिवाचे इतके आभार मानतो की, 'बाबा तुमचे कोटी कोटी धन्यवाद! आज राजकारणाने गाठलेली नीचतम पातळी पाहता बाबांनी स्वतः येऊन मला वाचवले. राजकारणापेक्षा हे उच्चस्थितीचे सदाकालचे मोठे पद देऊ केले. माझ्या आयुष्याला राजकारणातील दलदलीतून वर काढले. आयुष्याला एक नवी दिशा दिली.

आता आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. मी माझ्या कुटुंबासोबत ईश्वरी ज्ञानात खूप उत्साहाने रस घेण्यास सुरुवात केली. माझ्या मुंबईच्या घरी मुलुंडला संस्थेच्या मुख्य प्रशासिका डॉ. दादी प्रकाशमणीजी ह्यांचे दोन वेळा आगमन झाले. त्यांच्याकडे बघून मला अजूनच दृढ निश्चय झाला की खरंच आयुष्य जगावे तर अशाप्रकारे. बघा बरं ५ वर्षांच्या कालावधीसाठी राष्ट्रपती पदाच्या विनाशी पदाच्या ऐवजी २५०० वर्षासाठी विश्वाचे राष्ट्रपती पद (विश्व महाराजा–महाराणी) प्राप्त करण्याचे लक्ष्य ठेवण्यातच जीवनाचे खरे सार्थक आहे.

आता रोजच माझे मन अष्टौप्रहर गात असते –

''साथ तुम्हारा प्रभू इतना है प्यारा, मिल गई मंजिल, मिल गया किनारा.''

***

---

(पृष्ठ क्र. ५ वरून)

दादी आम्हाला अशा गोष्टी सांगायच्या, ते ऐकून बुद्धिचे ताळेच उघडले जाई. त्या दिवशी बाबांच्या मुरलीत होते की, 'छोटीसी इन्द्रिया भी आपको खिंचके ले जा सकती है' (छोटेसे कर्मेंन्द्रिय सुद्धा तुम्हाला परमेश्वरापासून दूर करू शकते.) आता प्रत्येकाने स्वतःला तपासायची ही वेळ आहे की 'ह्या सर्व इंन्द्रियांवर आपण कुठवर विजय मिळवला आहे? कुठवर ह्या सर्व गोष्टींच्या पार आपण गेलो आहोत. जीव्हारस वाटतो तेवढा छोटा नाही, ही खूप मोठी गोष्ट आहे. तो आपली बुद्धी भटकवू शकतो. लोक जीव्हा रसास्वादनासाठी चोरी करायलाही मागे पुढे बघत नाहीत.

बाबांनी एकदा खाऊविषयी सांगितले होते. खाऊ बघितला आणि लोभापायी न विचारता उचलून खाल्ला. त्याला बाबा म्हणायचे 'चोरी' तुम्हाला हवे असल्यास जे प्रमुख आहेत त्यांना विचारून घ्या ना! पण न विचारता घेणे म्हणजे 'यज्ञात चोरी करणे' होय.

तर कोणकोणत्या गोष्टींचे आपसात कसे कसे संबंध तयार होतात, तसेच आपल्या बुद्धिवर त्याचा कशाप्रकारे प्रभाव पडतो, ह्या सर्व सूक्ष्म गोष्टी बाबा आपल्याला रोजच्या मुरलीद्वारे समजावत असतात. म्हणून रोजची मुरली विधिवत सेंटरला जाऊन ऐकणे अधिक महत्वाचे ठरते.

***



# चिंतन

## एक भरोसो...

**ब्र.कु. साहेबराव, पाबळ**

रामचरितमानसमध्ये तुलसीदासांनी एक सुंदर रचना केलीय.

**'एक बल एक भरोसो एक आस बिस्वास**
**एक राम घनश्याम हित चातक तुलसीदास'**

अर्थ – तुलसीदासांची अवस्था चातक पक्ष्याप्रमाणे आहे. साहित्यिक कल्पनेनुसार हा पक्षी फक्त पावसाचे (थेट ढगातून पडणारे) पाणीच पितो, बाकी वर्षभर पाणी पीत नाही. त्याप्रमाणे देवावरच माझा विश्वास आहे, तोच माझी आशा आहे, भरोसा त्याच्यावर ठेवलाय आणि तेच माझे बलस्थान आहे.

अनेकदा आपणही, सर्वसामान्य माणसे म्हणतो, आता जे काही होईल ते मी देवावर सोडलंय. मात्र स्वतःच्या मनाशी प्रामाणिक राहून उत्तर विचारले तर आपण किती प्रमाणात निश्चिंत होतो? देवावर सोपवलंय म्हणजेच चिंता आपण करायची नाही. चिंतेपासून मुक्तता होते का? या प्रश्नांची उकल करण्यापूर्वी एक छोटीशी गोष्ट पाहूयात

एका गावात दुष्काळ पडला. सलग तीन वर्षे पाऊस पडलाच नव्हता. गावकरी मेटाकुटीस आले होते. पाणी नाही, अन्नसाठा संपत आलाय. लेकरा–बाळांचे देखील काय होणार? गावातला कुणी वृद्ध, अनुभवी म्हणतो आता एकच आशा आहे. सर्व गावकऱ्यांनी एकत्र येऊन मनापासून देवास आळवा त्यातून काही झाले तर !

त्या संध्याकाळी गावाच्या वेशीवरच्या मोठ्या शिवमंदिरात सगळे एकत्र येऊन प्रार्थना करतात. हे सगळे, एक लहान मुलगा देखील ऐकत असतो, तो मात्र छत्री घेऊन येतो. पहिल्या दोन दिवशी पाऊस पडत नाही, तिसऱ्या दिवशी गावकरी ठाण मांडून बसतात आणि पाऊस पडायला सुरूवात होते. लहान मुलगा पहिल्या दिवसापासून छत्री घेऊन येत असतो. बाकी कुणीच छत्री आणलेली नसते, याला म्हणायचे एक भरोसा एक बल.

मोठी माणसे बुद्धी अधिक चालवतात त्यामुळे भावनेची ताकद कमी पडते, लहान मुलाच्या मनांत असा संशय नसतोच. तर्कवादी माणूस म्हणतो, देवाची प्रार्थना केली म्हणजे काय आपण निष्क्रिय व्हायचे का? अशा प्रकारामुळे समाज निष्क्रिय होईल नाही का? प्रयत्न थांबवायचे नसतात मात्र त्यानुसार फळ मिळेल यावरच विश्वास ढळू द्यायचा नाही आणि प्रयत्नात कसूर करायची नाही हीच तर जीवनातली लढाई आहे.

ज्याला आपण अतिशय चांगले ओळखतो त्याच्यावरच विश्वास ठेवणार ना! मग देवास आपण चांगले ओळखतो का? त्याचे खरे रूप काय आहे? माझी प्रार्थना त्याच्यापर्यंत पोहोचते का? या प्रश्नांबाबत आपण कधी वेगळे कष्ट घेतो का? 'नाही' असे उत्तर येण्याची शक्यताच जास्त आहे. भक्ती म्हणजे मागणे आहे, त्यात भावनेची पराकाष्ठा आहेच; पण एकतर्फी मागणेच अधिक आहे. याउलट ध्यान किंवा राजयोग म्हणजे संवाद आहे. राजयोग म्हणजे एक प्रकारे भक्तियोगच आहे. 'देवासी प्रेमप्रीतीने बांधावे' असे संतांनी वर्णन करून ठेवली आहे, नेमके तेच राजयोगाचे मर्म आहे. जसे भाषेद्वारे संवाद साधतो तसे. त्यासाठी यथार्थ परिचय हवा. जसे, एखाद्याला पत्र लिहायचे तर त्याचा पूर्ण पत्ता हवा ना! साक्षात ईश्वर येऊन आपले कार्य करत आहे. प्रजापिता ब्रह्माबाबांच्या द्वारे शिवपित्याने आपले ज्ञान प्रकट केले या घटनेस आता ऐंशीहून अधिक वर्षे लोटली. जन्मोजन्मी आपण भक्ती केली, त्याचेच फळ म्हणजे ईश्वर येऊन आता ज्ञान देत आहे. आपण नश्वर देह नसून एक चैतन्य आत्मा आहोत. जसे वस्त्र बदलावे तसे आपण (आत्म्याने) देह धारण केलेत आणि सोडलेत. यालाच जन्म–मृत्यूचे चक्र

(पृष्ठ क्र. १८ वर)



# कर्नल साहेबांचा अनुभव

**कर्नल विलास, कोल्हापूर**

मी कर्नल विलास सुरकुडे. मी कोल्हापूर, महाराष्ट्र येथील रहिवासी आहे. (इंडियन आर्मी कोल्हापूर) माझा जन्म शेतकरी कुटुंबातला. १९७९ मध्ये मी सैन्यात आलो. सैन्यातून मी कर्नल या पदावरून निवृत्त झालो. माझे शिक्षण MA MBA Managment Studies Diploma in Disaster Managment. मी वास्तू संबंधित बरेच कोर्सेस केले. मी खेड्यातून आलोय त्यामुळे गावाबद्दल मला खूप प्रेम, आपुलकी आहे. तसेच ह्या सैनिकी नोकरीत गेली ३९ वर्षे असल्याने तेथील शिस्त, अनुशासन ह्या गोष्टी विशेष अंगी भिनल्या आहेत. मी २०१८ साली निवृत्त झालो. तेव्हा माझ्या लक्षात आलं, आपण आयुष्यभर देशसेवा केली; पण आता आपण समाज सेवा करायला हवी. कारण आपण आपल्या ह्या समाजाचे ही देणं लागतो. ह्या मागील कारण असे– मी जेव्हा २०१८ साली निवृत्त झालो. तेव्हा मी दोन वृद्धाश्रमांना भेटी दिल्या होत्या. तेव्हा लक्षात आलं आपले जीवन फक्त काही मिळविण्यासाठी किंवा घेण्यासाठीच नसून देण्यासाठीही आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन मी समाजकार्याला सुरुवात केली. त्याचवेळी मला अजून एक संधी मिळाली. मी कोल्हापूर जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या मेडिकल सर्व्हिस इंचार्ज म्हणून रुजू झालो. इथे माजी सैनिकांना मेडिकल सर्व्हिस देण्यासाठी ४ वर्षे सेवा केली. १२३५ गावाचे माजी सैनिक येथे येतात. हे सर्व करत असताना मला वाटायला लागले की शेवटी जीवनाचे अंतिम सत्य तरी काय आणि आपण त्यासाठी काय करायला हवे? ह्या विचारांतूनच मग अजून समाजसेवा कशा प्रकारे करता येईल ह्याकडे लक्ष जायला लागले. त्यानंतर ह्या संस्थेच्या माध्यमातून पूरग्रस्तांसाठीही कार्य केले. बऱ्याच लोकांना औषधोपचार केले त्यात पोलीस, डॉक्टर्स, नर्सेस ह्या लोकांना मदत करायला सुरुवात केली. तसेच अनेक शाळांत जाऊन मुलांना मार्गदर्शन करणे, देशसेवा काय आहे, ती कशी करावी ह्यासाठी उद्युक्त करणे, स्वाभिमान कसा निर्माण करावा? आत्म निर्भर कसे व्हावे? या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रम सुरु केले. हे सर्व करत असताना वाटले आपण नक्की काय करतोय? आपण नेमके काय करावे? जेणेकरून चांगल्या समाजाची निर्मिती होईल, समाजातील प्रत्येक व्यक्ती ही चांगली नागरिक बनून सामाजिक कार्यात सक्रिय होईल. यासाठी आपल्याला काय बरे करता येईल? त्या अनुषंगाने कामाला लागलो. समाजातील वेगवेगळ्या लोकांचे विचार ऐकत, त्यांचे सहकार्य घेत, NGO संस्थांचे कार्य बघत, अभ्यासत वाटायला लागले की आपल्याला समाजातील लोकांसाठी अजूनही काही करता येईल. याकामी माझे एक सहकारी श्रीकांत नरगटी ते समाजकार्यात अग्रेसर असतात, प्राध्यापक आहेत ते माझ्या संपर्कात आले. ते ब्रह्माकुमारी संस्थेशी जोडलेले आहेत. मागील १५ वर्षांपासून ते मला म्हणत होते, सर एकदा तुम्ही आमच्या संस्थेला भेट द्या. म्हणून मी कोल्हापूर सेवाकेन्द्राला त्यांच्यासोबत गेलो असता असे जाणवले, की खरंच ह्या संस्थेत काहीतरी वेगळेपण आहे. ही संस्था निःशुल्क कार्य करते, कोणत्याही प्रकारच्या देणगी मागत नाही. मग ही संस्था चालते तरी कशी? ह्यांचे विचार काय आहेत? एकदा रात्री १० वाजता श्रीकांत नरगटींचा फोन आला असता त्यांनी मला माउंट आबू येथे जाण्यासंबंधी विचारले असता मी लगेच होकार कळवून टाकला. ‘आपण नक्की जाऊ’ असे म्हटले.

इथे (आबूला) आलो असता मला खूप काही शिकायला मिळाले. एक नवीन आचार-विचार-व्यवहार मार्ग सर्वच अनुभवायला मिळाले. मी हुपरी सेवाकेन्द्रातर्फे आलोय. इथे येऊन मला जाणवले एक वेगळी परंपरा,

वेगळी प्रथा, वेगळे संस्कार इथे आहेत. तसेच इथली सर्वच कामे एखाद्या परिकल्पनेप्रमाणे चालत आहेत. इथली सर्वात मोठी कोणती गोष्ट मला आवडली असेल, तर मी एक आर्मी ऑफिसर असल्या कारणाने इथले अनुशासन, साफ-सफाई, शांत वातावरण, आज्ञा पालन हे फार आवडले. त्याचबरोबर त्याहीपेक्षा सुंदर गोष्ट म्हणजे सर्वच भाऊ असो अथवा बहिणी - त्यांच्यातील निरागसपणा मनाला फार भावला. ज्याला आपण मराठीत वात्सल्य म्हणतो. सर्वांकडे बघायची त्यांची दृष्टि-वृत्ती, प्रत्येकाला भेटण्याची पद्धत आपुलकी आणि प्रेमाने भेटून विश्व बंधुत्व कसे वृद्धिंगत करता येईल, प्रत्येकाला कसे समजून घेता येईल, जीवनात संयम कसा राखता येईल ह्या गोष्टी फारच वेगळ्या आणि डोळ्यात भरण्याजोग्या वाटल्या.

इथल्या लोकांच्या चेहऱ्यावरचा तजेलदारपणाही आकर्षक वाटतो. दिवसातल्या कोणत्याही वेळी भेटा, ते सर्व हसतमुख असतात, मरगळ अशी जणू काही त्यांना माहीतच नाही. त्यामुळेच सद्भावना आणि आपुलकी दाखवत सर्वांना आपलेसे करतात. सर्वांना त्याही नकळत जवळीक साधून सामावून घेतात. हे सर्व गुण मला फार फार आवडले. आमच्या आर्मीत वेगळेच अनुशासन नियम आणि मर्यादा वर चालते. पण इथली पद्धत जगावेगळी आहे, पण मी विचार करतोय ती मी कशाप्रकारे आत्मसात करु? हे एक प्रकारचे आव्हानच वाटले की अरे आपण जी रोजची काम करताना एवढे कष्ट घेतो, ती सर्व कामे सहज साध्या, सोप्या पद्धतीनेही होऊ शकतात! दुसऱ्यांकडून कामे करून घेताना ती गोड बोलून सुद्धा करून घेता येतात. संयम ठेऊन काम कशाप्रकारे करता येते? हा पहिला गुण ह्या संस्थेत मला सापडला.

दुसरा म्हणजे येथे प्रत्येकात सहकार्यांची भावना आहे. मी बऱ्याच जणांना विचारले की तुम्ही हे जे काम करता त्यासाठी पगार मिळतो का? तर त्याचे उत्तर नाही असे मिळाले. ते म्हणाले आम्ही सर्वजण येथे (स्वेच्छा) सेवाधारी म्हणून कार्यरत आहोत. मग माझ्या लक्षात आले की सेवा म्हणून काम करणे आणि पगार घेऊन काम करण्यात काय फरक असतो? एखादा पगार घेतो तेव्हा तो त्या कामाकडे फक्त एक नोकरी म्हणून पैशासाठी बघत असतो, त्यात आपुलकी नसते. पण इथे मात्र सेवा म्हणून काम करताना समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य प्रत्येक जण फेडत असतो. समाजातील दुर्गुण संपवून सगुण संपन्न समाज निर्मिती येथे होत आहे. ह्यासाठी ह्या संस्थेचा प्रत्येक सदस्य भाऊ किंवा बहीण झटत असतात. ही फार नावीन्यपूर्ण गोष्ट वाटली. कुणाकडून कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता सेवाभाव ठेवून कशाप्रकारे काम करावे हे बघण्यास, शिकण्यास मिळाले. पण हे सर्व केवळ विचार करून शक्य होणार नाही, तर त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न देखील अंगीकारावे लागतील. इथले भाऊ-बहीण ह्याच एका उद्देश्याने झपाटून सेवा करत असतात. अशी झपाटलेली वेडी लोकच अशाप्रकारची समाजसेवा निःस्वार्थ भावनेने करू शकतात.

इथे येऊन खरेच सांगतो स्वर्गानुभूती झाली. कुणी कुणाचा द्वेष करणे, हेवेदावे करणे, कुणाच्या वाकड्यात शिरणे, स्पर्धा करणे ह्या सर्वच गोष्टी इथे मला दिसल्याच नाहीत. सर्वच जण आपापल्या कामात (सेवेत) गर्क. ज्याची जी सेवा असेल, तो ती निमूटपणे आनंदाने, उत्साहाने करत असतो. मला हे काम नको, ते द्या, त्याला ते का मला हे का? असे रुसवे-फुगवेही दिसले नाहीत. तसेच माझा फोटो आला नाही, मला स्टेजवर बोलावले नाही. हे ही नाही इथे येऊन मला ४ दिवस झाले पण इथे कुणाच्याच मनात किंवा कार्यात स्पर्धाभाव दिसला नाही. म्हणूनच मला वाटते ही संस्था इतक्या वर्षांपासून (१९३६ पासून) अथक चालू आहे. ही संस्था एवढ्या मोठ्या प्रमाणावर नावारुपास आली ह्याचे कारण सर्वांचेच निःस्वार्थपणे केलेले परिश्रम, सेवाभाव. ह्या लोकांनी चेहऱ्यावरचा निष्पाप भाव, भाबडेपणा जपल्याने सर्व गोष्टी सहज होत जातात. तुम्ही दिवसाच्या कोणत्याही प्रहरी भेटा सकाळ, दुपार, संध्याकाळ - हे लोक तेवढ्याच उत्साहाने निरागसतेने सेवा करताना भेटतील. येणाऱ्या पाहुण्यांना कधीही वाटले की आता ह्या क्षणी मला चहा-कॉफी कुठले तरी पेय मिळाले तर - म्हणायच्या आत ते आमच्या सेवेत तत्पर असतात. हे सर्व आपल्याला घरात काय, हॉटेलात पैसे देऊनही एवढी तत्परता बघायला मिळणार नाही. हे फक्त त्यांच्या समाजाप्रति काही तरी देण्याची भावना असल्याने घडत असते. ह्याच प्रेमभावनेने येथील वातावरण फार-फार वेगळे, आत्मीयतेने भरलेले, संवेदनायुक्त प्रकंपन अनुभवायला मिळतात. वातावरणातील शांतता मनात भरून राहते. फार हलके-हलके वाटते.

त्यामुळे आपण वेगळ्याच दुनियेत जगतोय असे वाटत राहते. येथील पवित्र वातावरणाचा आपल्यावर एवढा परिणाम होतो की, मग आपणही असे छान–छान वागू शकतो. अशी परिवर्तनाची भावना मनात निर्माण होते.

एवढेच नव्हे तर ह्या संस्थेत इतकी स्वच्छता आहे की, त्यामुळे मन फारच प्रसन्न राहते. एवढी स्वच्छता कुठे बघायला मिळणे आज दुरापास्त झाले आहे. आबालवृद्ध कुणीही कुठेही कचरा टाकत नाही, कुठे एखादा कागदाचा तुकडा पडलाच तरी सेवाधारी तत्परतेने तो उचलून स्वच्छता ठेवण्यास मदत करतात. एक दुसऱ्याचे बघून सर्वच स्वच्छता राखण्यास मदतच करतात. स्वच्छतेमुळेही ह्या संस्थेची गुणवत्ता नक्कीच वाढत आहे. तसेच ग्लोबल समीटमध्ये मला काय बघायला मिळाले तर – फक्त आपल्या सनातन धर्माचीच नव्हे, तर वेगळ्या मार्गाने देशाची उन्नति कशाप्रकारे होईल – शैक्षणिक, कृषि, सुरक्षा विभाग अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून समाजातील प्रत्येक घटकाला काही न काही देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणेकरून समाजाचे उत्थान चांगल्या, सकारात्मक मार्गाने होईल त्यासाठी हे लोक अहोरात्र झटत आहेत. हे खरंच नावीन्यपूर्ण आहे. समाजातील सर्व घटकांना देण्यासाठी ह्यांच्याकडे काही न काही चांगले आहेच आहे. – हे जगासमोर एक सुंदर उदाहरण आहे. कुठलीही संस्था एका उद्देशाने भारावून काम करत असते. पण इथे सर्वच फार वेगळे आहे. समाजातील सर्वच स्तरांसाठी हे लोक काम करतात – जसे कृषि–एकाच वेळी ५–५ पिकं कशाप्रकारे घेता येतील, योगिक शेतीबद्दल ते संशोधन करतात. कारण शेतकऱ्यांची प्रगती हीच देशाची खरी प्रगती.

आपला देश कृषिप्रधान असून ७०% शेती इथे होते. मग शेतकऱ्यांची मानसिकता चांगली असल्यास समाजातील इतर घटकांवरही त्याचा परिणाम नक्कीच चांगला होईल. उत्पन्न वाढल्याने तेही सुखी तर समाजही सुखी. याचप्रकारे शैक्षणिक क्षेत्र, अथवा सुरक्षा रक्षकाबद्दल. तसेच येथे सोलारचा अति मोठा, जागतिक पातळीवरचा प्लांट आहे. हा सोलार प्लांट गेली अनेक वर्षे वीजनिर्मिती करत आहे. यावरून कळेल ही संस्था किती आधुनिक पातळीवर काम करतेय. येथे प्रत्येक काम एकदम चांगल्या प्रकारे करतात, असे वाटते आपोआप मशिनद्वारे सर्व कार्ये होतात. तसे पाहिले तर कुणी कुणाला आदेश देतोय. मग काम करतात – असे कुठेही दिसून येत नाही. सर्वच कामे सहजगत्या होताना दिसतात जसे एखादा मोठा भव्य–दिव्य दहा–पंधरा हजार लोकांचा कार्यक्रम झाल्यास १० मिनिटात तो हॉल (सभागृह) स्वच्छ करून पुढल्या कार्यक्रमासाठी तयार ठेवतात. हे सगळेच अद्भूत आहे. व्यवस्थापनच जबरदस्त आहे. त्याला कारण इथले सेवाधारी सर्वचजण मनापासून सेवारत असतात. आता ग्लोबल समीटचा कार्यक्रम झाला, इतके व्ही.आय.पी., आय.पी.एस. आले, राष्ट्रपति आल्या पण कुठेही धावपळ, अथवा गडबळ–गोंधळ दिसला नाही. हे सर्व इथल्या (सेवाधारी) लोकांच्या मानसिकतेमुळे, तसेच ह्या जागेच्या पावित्र्यामुळे घडत आहे. इथे ह्या जागी आल्या क्षणीच प्रत्येकाचे मनच नाही तर, बोलण्याची भाषाही बदलते. मानसिक स्तरावर विचारही बदलतात. ह्या जागेला आपण कल्पवृक्षाची उपमा देऊ शकतो. मनुष्य आपादमस्तक बदलून जातो. आपल्या भारताचं वर्णन 'सोने की चिडिया' असे करतात. पण भविष्यातही पुन्हा त्याच पातळीवर देशाला कसे घेऊन जाता येईल, भारत विश्वगुरु कसा बनेल – हे ही भारतीय संस्कृतीच्या महिमेला साजेसं महत्त्व इथे विषद करतात. सकाळीच उषा दीदीनी सांगितलं की सर्वधर्म समभाव अथवा सर्व धर्माचा पिता कसा एकच आहे. ईश्वराला वेगवेगळ्या नावाने साद घालतात. पण 'सबका मालिक एक' हे कशाप्रकारे सिद्ध होते. असे विचार ऐकले की वाटते इथे काहीतरी वेगळेपणा आहे. भेदभाव नाही. सर्व धर्मांची लोकं इथे येऊन लाभ घेऊ शकतात – इथे शिकवले जाणारे ज्ञान, ध्यानधारणा शिकून स्वत: कोण आहोत? कुठून आलोय? जगात आपले काम काय आहे? सर्व जाणून घेऊ शकतात कारण सर्वच जण एका परमपित्याची मुले असल्याने प्रत्येकाचा तो अधिकारच आहे. इथले कार्यक्रम केवळ एका धर्मासाठी नसून, जागतिक स्तरावरील प्रत्येकासाठी आहे. आपल्या देशात अनेक संस्था आहेत पण ही संस्था १३० देशांत पसरलेली आहे.

हे ज्ञान ऐकले, पूर्णपणे, शांत डोक्याने विचार केला तेव्हा कळते की, खरोखर हे जे सांगतात ते सत्य आहे. पण आपणच त्या दृष्टिने कधी विचार केला नाही. ह्या संस्थेत हे ही सांगतात जसे एक (मनुष्य) पुरुष शिक्षित तर तो एकटाच, पण जर घरातील स्त्री शिकली, तर सर्व कुटूंबच शिक्षित होते – तद्वत इथे म्हणतात) मातेने ईश्वरी

ज्ञान घेतले तर सर्वच घर स्वर्ग बनेल. तसेच येथील सर्व कार्य स्त्रियाच चालवतात. दादीजी, दीदीजी - ही एक आगळी वेगळी गोष्ट म्हणावी लागेल. दादा लेखराज (बाबा) ह्यांनी फार छान प्रकारे संस्थेचे बस्तान बसवले - पायाच मजबूत असेल तर इमारत मजबूत होते म्हणतात न, तसेच काहीसे. मोठ्या-मोठ्या पदावर स्त्रियांना बसवून, त्यांना तयार करून हे कार्य परमेश्वर कार्य पार पाडत आहेत.

मी अनेक सैनिकांना भेटतो, त्यांच्या घरी भेटी देतो. आमचा सैनिकी पेशा असा आहे की रोजच मरणाला आम्ही सामोरे जात असतो. प्रत्येक सैनिक कोणत्या ना कोणत्या रीतीने दु:खी आहेत. त्यांना घरी जाता येत नाही, सुट्टी मिळत नाही, मिळणारे काम अती जोखिमेचे असते. लढाई केव्हाही सुरू होऊ शकते. इतरही अनेक चिंता असतात. मला इथे जे ज्ञान मिळाले आहे, जे मार्गदर्शन मिळाले आहे ते सर्व मी कार्यात आणेन. स्वत:च्या कुटुंबाबरोबरच सर्व समाजासाठीही ज्ञान नक्की वापरात आणेन. मला इथे आणले त्यासाठी मी हुपरी सेंटरच्या बहेनजी, श्रीकांत भाऊ ह्यांचे ही आभार व्यक्त करतो. त्यांच्यामुळेच मी इथवर आलो. बाबांनीच माझी ह्या वेगळ्या समाज उपयोगी ज्ञानासाठी निवड केली आहे. पण त्यातही अडथळे आले बर कां! यायचे ठरले ते अचानक रात्री १०.३०ला मी होकार दिला, तिकिटही वेटींग ८-७ नंबरवर होते. पण बाबांची कृपा म्हणा यायच्या-जायच्या सर्व सीट कन्फर्म झाल्या. इथे आल्यावर ही सर्व गोष्टी आपोआप घडत गेल्या. ह्यासाठी बाबांचे मी खूप-खूप आभार मानतो. ही संस्था अशाच प्रकारे फळफळू दे - जगात वैश्विक स्तरावर - भारतात सुवर्णकाळ आणण्यासाठी प्रयत्न करतेय ते सफल व्हावेत. ही माझी मनापासून शुभेच्छा आहे. त्या दृष्टिने मीही खारीचा वाटा देण्याचा प्रयत्न नक्कीच करीन. बाबांनी आम्हाला त्यासाठी आशीर्वाद द्यावेत हीच नम्र प्रार्थना.

***

---

(पृष्ठ क्र. १४ वरून)

म्हटले आहे. आत्मा, अजर, अमर, अविनाशी आहे. मन-बुद्धी-संस्कार आत्म्याची सूक्ष्म कर्मेंद्रिये आहेत. देहाचे भान विसरून निराकार शिव पित्याच्या आठवणीत रममाण होणे यालाच 'राजयोग' म्हटले जाते. जसा आत्मा मूळ रूपात देहातीत आहे तसा ईश्वरही निराकार आणि सदैव देहातीत आहे. देव, जन्म-मृत्यूच्या बंधनात अडकलेला नाही, तो त्यापासून अलिप्त आहे. ज्ञान प्रकट करण्यासाठी परमेश्वराला मनुष्य सृष्टीतील देहधारीच्या माध्यमाचा आधार घ्यावा लागतो. राजयोगाच्या अभ्यासाने संस्कार परिवर्तनाची शक्ती प्राप्त होते. अशा आठवणीद्वारे काय होते? देवावर सज्ञान होऊन प्रेम केल्यास प्रतिभाही जागृत होते उदा. संत महात्मे, कवी इ. अनेकजण श्वासावर लक्ष केंद्रित करतात त्याने श्वासगती धीमी होते. निराकारावर नुसते ध्यान केंद्रित केले तर, श्वासांची गती मंदावते म्हणजे जणूकाही आरोग्यप्राप्ती आहे. राजयोगाच्या साधनेत आपोआप हा अनुभव होतो. जसे भक्तीत मंत्रजप केल्यास सिद्धी प्राप्त होतात, तद्वत राजयोगाद्वारे अष्टशक्ती प्राप्त होतात. गीतेत कर्मयोगाचे वर्णन आढळते, कर्म करताना शिव पित्याच्या आठवणीत रममाण होणे म्हणजे कर्मयोग. 'कर्म हाच योग नव्हे, तर कर्म करताना मन-बुद्धी देवाशी जोडणे. योग म्हणजे जोडणे. कर्मयोग साधला तर उत्तम फलप्राप्ती निश्चित आहे. हेच आहे कर्मफळाविषयी चिंता न करता कर्म करणे.' असेही म्हणतात 'नर ऐसी करनी करे जो नर से नारायण बन जाये'.

राजयोगाच्या साधनेद्वारे निश्चिंत स्थितीकडे साधकाची वाटचाल होत राहते. अर्जुनाच्या संदर्भात एक अतिशय सुंदर गोष्ट सांगतात. महाभारतातील युद्धात अर्जुनाच्या समोर साक्षात भीष्म पितामह उभे ठाकलेले असतात. ते प्रतिज्ञा करतात, उद्या मी जगाला थक्क करून टाकणारा पराक्रम करेन. माझ्या शर कौशल्याची सर्वोच्च स्थिती पाहायला मिळेल. श्रीकृष्ण, भीष्मांचा पराक्रम जाणत असतो. अर्जुनाचा टिकाव लागणार का असा प्रश्न पडावा इतकी गंभीर प्रतिज्ञा होती. आदल्या दिवशी संध्याकाळी श्रीकृष्ण अर्जुनाच्या शिबिरात जातो, पाहतो तर अर्जुन निश्चिंत होऊन पहुडलेला असतो. परिस्थितीची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने श्रीकृष्ण अर्जुनाला विचारतो तेव्हा तो म्हणतो, 'पितामहांशी लढताना काय काळजी घ्यायची ती चिंता मी कशाला करू? तू आहेस ना माझा मार्गदर्शक'. हेच ते भाररहित होणे आहे. अर्जुनाने आपले प्रयत्न सोडले नाहीत; पण ते श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनानुसार केले. अशी निश्चिंत स्थिती आपल्याला प्राप्त होवो हीच मंगल कामना.

***

# "पृथ्वीचा गोळा हातात दिसला..."



**ब्र.कु. शेखर, शांतिवन**

माझा जन्म तेलंगाणा राज्याच्या करीमनगर जिल्ह्यात ५ डिसेंबर १९६७ साली झाला. आम्हा तीन भावंडांमध्ये (भाऊ-बहीण) मी मधला आहे. लौकिक मोठा भाऊ आणि लहान बहीण हे माझे कुटुंब. मी १९९३ पासून बाबांच्या महायज्ञात समर्पित आहे. माझे १२वी पर्यंतचे शिक्षण करीमनगरच्या जवळील वेमुलवाडा भागात झाले. माझे वडील इथेच नोकरीस होते. त्यानंतर महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील धामण गावात पॉलिटेक्निकल डिप्लोमा करण्यास गेलो. तेथून डिप्लोमा पूरा होताच परत आपल्या करीमनगर शहरात परतलो.

व्यापार सुरू केला - मी १२ वी पर्यंतचे शिक्षण तेलगू भाषेत केले होते. परंतु इथेच हिन्दी प्रचार सभावाले खाजगी परीक्षा घेत असत. त्या परीक्षा मीपण दिल्या आणि मला हिन्दीत 'भूषण' आणि 'विद्वान' ह्या दोन्ही नावांनी उपाधी मिळाल्या. म्हणूनच तेलगू भाषिक असूनही मला हिन्दी भाषेवर मोठे प्रभुत्व प्राप्त झाले. करीम नगरला परतल्यावर मी माझा व्यवसाय सुरू केला. मला हिन्दी चांगली येत असल्याचा फायदाच झाला, तो असा - सरकारी कॉलेजात हिन्दीचे ३ पिरीयेडस् (वर्ग) घेण्यास मी जाऊ लागलो. माझी उंची जवळ-जवळ ६ फूट इतकी आहे. त्यामुळे मी बास्केटबॉल खेळायलाही जाऊ लागलो. तसेच युनिवर्सिटीच्याकडून २ वेळा मॅचमध्येही भाग घेतला. मला संगीताचाही नाद होता, म्हणून मी व्हायोलीन आणि तबला शिकायला एका क्लासमध्ये जात असे.

**आध्यात्मिक ठिकाणी लौकिक गोष्टी करणे चांगले नाही.**

माझा स्वभाव शांत, मितभाषी असल्याने मला फारसा मित्र-परिवार लाभला नाही. मी साधारण संध्याकाळी ६ पर्यंत घरी यायचो. माझे वय आता २४ झाले होते, पण तरीही मला लग्न करण्यात काहीच स्वारस्य नव्हते. मला मुलींशी बोलायचे म्हटले की, जीव घाबरा व्हायचा, लाज वाटायची. मी फक्त माझ्या लौकिक आई आणि बहिणींशीच बोलायचो. दुसऱ्या कुणा मुलींशी बोलावे असे कधीच वाटले नाही, माझे तसे मुलींकडे लक्षही नसे. माझे लौकिक कुटुंब धार्मिक सनातनी होते. त्यामुळे घरात श्री लक्ष्मी-श्री-नारायणाची पूजा व्हायची. वेमुलवाडा येथे एक शिवाचे देऊळ होते. तिथे पूजा-भजन-कीर्तन चालायचे. जेव्हा-जेव्हा आई-बाबा तिथे भजनाला जायचे, त्यांच्याबरोबर मीही हजेरी लावायचो. त्यामुळेच माझे मन अध्यात्माकडे वळायला लागले. त्याच काळात मी करीमनगर मध्ये एका मेहर बाबाच्या सत्संगाच्या संपर्कात आलो. सत्संग आवडल्याने मी तिथे रोजच जायला लागलो. त्यांचे प्रवचन ऐकायला लागलो. पण त्या ठिकाणी एकदा कुणीतरी माझ्यासमोर लग्नाचा विषय काढला... मला वाटले की, इथे या आध्यात्मिक जागेत लौकिक गोष्टी का करत आहेत हे लोक! मला काही हे पटले नाही. मग मी तिथे जाणेच बंद केले.

**ईश्वराने माझ्या बुद्धीचे कुलुप उघडले.**

करीम नगरात एकदा व्यापारासंबंधी मेळा लागला होता. मी तो बघण्यास गेलो. पण जेव्हा मी मेळ्यात पोहोचलो, तेव्हा तो जवळ-जवळ संपतच आला होता. सर्व लोक आपापला स्टॉल आवरत होते. परंतु ह्या मेळ्यात एक विज्ञानाचा विभाग (स्टॉल) मात्र चालू होता. मी त्या विज्ञान विभागातील चित्र बघितले. ह्याच्या बाजूलाच ब्रह्माकुमारीज्‌चाही स्टॉल होता. हा स्टॉल त्यांनी त्याच दिवशी लावला होता, कारण ह्या आधी ब्र.कु. बहिणी कुठे दुसरीकडे सेवेत व्यग्र होत्या म्हणून स्टॉल लावायला त्यांना अंमळ उशीरच झाला होता. ... आता मला वाटतेय ब्र.कु. बहिणींनी तो स्टॉल माझ्यासाठीच लावला असणार. ब्र.कु.च्या स्टॉलमध्ये जी चित्रे होती,

त्या चित्रांसमोर एक-एक कुमारी (श्वेत) पांढरी वस्त्रे परीधान करून उभी होती. मला हे सर्व बघून फारच आश्चर्य वाटले. जे-जे लोक येत होते, त्या सर्वांना त्या बहिणी फारच उत्साहाने आणि मनोभावे चित्र समजावत होत्या. मलाही त्यांनी सर्व चित्रे समजावली. जेव्हा मला परमात्मा शिवाचा परिचय दिला गेला. शिवलिंगाबद्दल सांगितले गेले, तेव्हा साक्षात् शिव परमात्म्यानेच माझ्या बुद्धिचे ताळे उघडले जणू! जेव्हा मी शिवाच्या मंदिरात आई-बाबांबरोबर पूजा करायचो, तेव्हा माझ्या मनात विचार यायचे, प्रश्न पडायचे की शिवलिंग हे काय आहे नक्की? हे त्रिपुंड का लावतात पिंडीवर? पण ह्या प्रश्नांची उत्तर मात्र मला कधीच मिळाली नाही. पण इथे येताच ब्र.कु. बहिणींनी जे सांगितले, त्यांच्या समजावण्यामुळे माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला!

**ज्ञानाच्या गोष्टी पटकन समजल्या.**

सर्व चित्र समजून, साहित्याचा (लिटरेचर) स्टॉल बघून जेव्हा मी जायला निघालो, तेव्हा ब्र.कु. बहिणींच्या मोठ्या दीदींनी मला बोलवले, 'भाऊ'. त्यांच्या त्या 'भाऊ' म्हणून बोलावण्यात फारच अलौकिक रस होता. कारण लौकिक मध्येही बरेच लोक मला 'भाऊ' म्हणत असत, पण त्यांच्या त्या बोलण्यात स्वार्थ किंवा नाटकीपणाचाच वास येत असे. पण ह्या बहिणीच्या आवाजात मात्र जगरहाटीच्या गोष्टींपासून दूर एक अलौकिक आनंद वाटला. मी मागे वळून त्यांच्याजवळ गेलो. विचारले, 'बोला ताई.' दीदींनी मला एक छापील कागद दिला. त्यात साप्ताहिक पाठ्यक्रमाची पूर्ण माहिती होती. आश्रमात येण्यासाठीची ती एक निमंत्रणपत्रिका होती. त्यांनी मला ते पत्रक देऊन सेंटरवर यावे आणि साप्ताहिक पाठ्यक्रम करा असे आग्रहाचे निमंत्रण दिले. मी हो म्हटले. कुणाला दिलेले वचन मी जरूर पूर्ण करायचोच. म्हणून ह्या घटनेच्या साधारण ३ दिवसांनी मी सेवाकेन्द्रावर गेलो. मेळ्यात भेटल्या होत्या, त्याच दीदी समोर आल्या. त्यांनीच माझा पाठ्यक्रम सुरू केला. नंतरचा एका भावाने घेतला. पाठ्यक्रम सुरू असताना माझ्या मनात कोणतेही प्रश्न आले नाहीत. ज्ञानाच्या सर्व गोष्टी मला खूप चांगल्या प्रकारे समजल्या. पाठ्यक्रम पूर्ण होताच. मला जेव्हा-जेव्हा वेळ मिळायचा, तेव्हा मी सेवाकेन्द्रावर मुरली ऐकायला जायचो. मुरलीचे वरदान आणि स्लोगन मी माझ्या वहीत लिहून घ्यायचो.

**सर्व लक्ष ज्ञानाच्या अभ्यासावर एकाग्र केले.**

साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केल्याच्या १५ दिवसांनंतर मला फार छान-छान साक्षात्काराची दृश्ये दिसू लागली. एका साक्षात्कारात असे दिसले, की **संपूर्ण पृथ्वीचा गोळाच माझ्या हातात आलाय.** मला जरी त्याचा अर्थ समजला नाही, तरी मला हे मात्र नक्की समजले, की मी जे ज्ञान ऐकतोय, त्यात अलौकिक अद्भूत शक्ती आहे... हे ज्ञान मी अजून खोलात जाऊन ऐकायला, समजायला हवे. कारण ह्यात प्राप्ती फार दिसतेय. त्यानंतर मी माझे सर्वच कार्य-व्यवहार-जसे संगीत शिकायला जाणे, बास्केट बॉल खेळणे, व्यापार करणे, कॉलेजात शिकवायला जाणे. हे सर्व गुंडाळले आणि आपले सर्व लक्ष ज्ञानावर, पुरुषार्थावर केन्द्रित केले. कॉलेजात माझ्याबरोबर शिकणारे २ भाऊदेखील मला बघून आश्रमात येऊ लागले. त्यांनीही साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केला आणि तेही नियमित विद्यार्थी बनले. त्याच काळात सेवाकेन्द्रावर एका सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले. ह्या यात्रेत एका गावाहून दुसऱ्या गावात जाणे, अमृत वेळेला उठणे, दैवी नियमांचे पालन करणे, लोकांना ज्ञान देणे. ह्या सर्व गोष्टींमुळे माझ्या धारणा अजून मजबूत झाल्या.

**वडिलांचे उत्तर ऐकून मी निश्चिन्त झालो.**

एक दिवस माझ्या मोठ्या भावाने बाबांना विचारले, 'हा रोज-रोज कुठे जातो?' आमचे वडील फारच शिस्तीचे आणि चांगल्या धार्मिक विचारांचे होते. ते माझ्या भावाला म्हणाले, 'हा तुझ्या-माझ्यापेक्षा खूप चांगला आहे. हा जिथे कुठे जातोय ती जागा. ते ठिकाण फार चांगले आहे. मला एवढेच कळते. 'बाबांच्या तोंडून हे ऐकून मला फार बरे वाटले. सायकल यात्रेदरम्यान मी आई-बाबांनाही सेवाकेंद्रावर घेऊन गेलो. बाबा फार उत्तम वक्ते होते. पण त्या अलौकिक सभेत ते इतके गद्‌गद् झाले, की त्यांच्या मुखातून शब्दच फुटेना. डोळ्यांतून मात्र सतत अश्रूधारा वाहत होत्या. त्यांनी संस्थेची फार स्तुती केली. आई-बाबांनी ही साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केला, आणि ते दोघेही सेवाकेंद्रावर ज्ञान मुरली ऐकायला यायला लागले.

**संगमयुगातील प्रत्येक क्षण... सफल केला.**

त्या काळात आश्रमातील

(पृष्ठ क्र. २४ वर)

# शिवबाबांचा सल्ला

ब्र.कु. चक्रधारी दीदी, दिल्ली

आजकाल आपल्या कुणा ब्र.कु.ची तब्येत बिघडली असता आपण काय म्हणतो, 'बाबा मला लवकर बरे करा ना!' तर इतर लोक म्हणतात, तुम्ही तर म्हणता आम्ही परमेश्वराची लेकरे आहोत, मग तुम्ही कसे बरे आजारी पडता? ते समजतात परमेश्वराचे बनले म्हणजे त्या व्यक्ती कायम निरोगीच राहतील. हे त्यांचे म्हणणे एका अर्थाने योग्यच म्हणावे लागेल कारण जेवढी बाबांची आपण आठवण करू तेवढी आपल्याला त्यांची शक्ती मिळून, विकर्माचे खातेही कमी कमी होत जाते आणि आत्मा स्वच्छ आणि पवित्र होत जातो.

पण त्याच वेळी हेही बघावे लागेल आपण आत्मिक स्थितीत आणि परमात्म स्मृतीत किती वेळ राहतो. हे आपण स्वतःच स्वतःला तपासावे. एकदा असेच साकार बाबांनी संदेशीला म्हटले की, 'हे संदेशी तू बाबांना सूक्ष्म लोकात भेट आणि शिवबाबांना विचार की बाबा जो रथ (देह) तुमच्या कार्यासाठी त्या रथाला खूप खोकल्याची उबळ येत असते आणि तुम्हाला मुरली चालवताना नक्कीच त्या गोष्टीचा अडथळा येत असणार. तर हे सर्व शक्तीमान पित्या, रथाचा खोकला कमी कर जेणेकरून तुम्हाला मुरली चालवणे सहज सोपे होईल.

तर ह्यावर विचार करा सर्वशक्तीवानाचा संदेश काय आला असेल बरे!

'मुलाला सांग, मी तर फुटलेल्या ढोलानेही आपले काम करवून घेईन. तुझ्या कर्माचे खाते, तुलाच निस्तरावे लागेल.' आता ह्यावरुन काय बोध मिळतो? प्रत्येक मनुष्य आत्म्याला आपल्या कर्माचे खाते स्वतःच निस्तरावे लागेल. विचार करा, जी व्यक्ती साकार माध्यम बनली, शिवबाबांच्या कार्यासाठी निमित्त झाली, त्यांनाही सर्वशक्तीमान परमेश्वराने सरळ शब्दांत हेच म्हटले. जेवढे योगबळ असेल, तेवढे तू ह्या कर्मभोगातून मुक्त होत जाशील. ह्यात बाबा काहीच करू शकत नाही.


आपणही खूप वेळा बाबांना म्हणतो, 'बाबा माझी ही गोष्ट ठीक करा, तब्येत ठीक करा, ही गोष्ट हरवली आहे शोधून द्या.' बाबा म्हणतात मी ह्या छोट्या छोट्या गोष्टींसाठी इथे आलेलो नाही. मी तर पतित-पावन आहे. मी तुम्हा मुलांना नरापासून नारायण, नारीपासून लक्ष्मी बनविण्यास आलेलो आहे, तुमच्या लहान-सहान गोष्टी ऐकून सुधारायला आलो नाही.

त्यासाठी मी तुम्हाला युक्ती सांगतो, तुम्ही योगबळाने आपल्या कर्मखाते साफ करू शकता आणि योग कसा करायचा ती युक्ती मी तुम्हाला सांगितलेली आहेच. त्याचा तुम्ही योग्य पद्धतीने वापर करा. बाबा तर तुम्हाला सद्गतीचा मार्ग दाखवायला आलेले आहेत. त्याचा सर्वांनी लाभ घ्या.

***

## दक्ष प्रजापती

असे म्हटले जाते, ब्रह्माच्या बोटातून दक्ष प्रजापतीचा जन्म झाला आणि असे म्हणतात की, सगळी मानव जात त्यांची मुले आहेत असेही मानतात की, प्रयाग क्षेत्रात विश्व-कल्याणासाठी त्यांनी ब्रह्म यज्ञ रचला. खरे पाहता कुणा मनुष्याद्वारे रचलेल्या यज्ञाने विश्वाचे कल्याण होऊ शकत नाही, परंतु विश्वाचे कल्याण फक्त शिवबाबाद्वारे रचलेल्या रुद्र-ज्ञान-यज्ञाद्वारे होते. प्रजापिता सुद्धा आदि देव आहेत आणि त्यांचे तन शिवबाबांचा रथ आहे. त्यांना दक्ष प्रजापिता म्हणू शकतो.



# रूप - बसंत

**ब्र.कु. मनोहर, गोरेगाव**

विशाल नगरीमध्ये महाराज चंद्रसेन आपल्या दोन राज्यांसह राहत असत. एकीचे नाव सुनीती होते, ती खूप भक्तीभावाने देवाची आराधना करायची. दुसरीचे नाव कनकलता, ती फारच हट्टी, दुराग्रही आणि आपले तेच खरे करणारी अशी. राणी सुनीतीला दोन मुले होती - राजकुमार रुप (कुंवर) आणि राजकुमार बसंत (कुंवर) हे दोन्ही राजकुमार फार हुशार आणि सुस्वभावी असून एकाग्रतेने राजविद्येचा अभ्यास करत होते. कनकलता राणीचा पुत्र मान कुंवर अती हेकेखोर आणि मस्तीखोर होता. तो राजविद्या शिकायचे सोडून उनाड मित्रांसोबत सर्वांना खूप त्रात देत राज्यात हिंडत असे. एकदा एका छोट्या आजाराचे निमित्त झाले, अन् त्यातच राणी सुनीतीचे देहावसन झाले. कनकलताने आता डाव साधत सुनीतीच्या दोन्ही राजपुत्रांना कावेबाजपणे राज्याबाहेर काढण्याचे आदेश दिले. राज्याच्या बाहेर गेल्यानंतर मोठा भाऊ रूप कुंवरने छोट्या बसंत कुंवरला समजावले की, आपण आपली खरी ओळख कुणालाच करून द्यायची नाही. आपण महाराज चंद्रसेनची राजकुमार मुलं आहोत, हे कुणालाही कळता कामा नये असे केल्यास आपल्या बाबांचे नाव खराब होईल. राजकुमार बसंत हो म्हणाला.

हे दोघे भाऊ आता एका गावातून दुसऱ्या, दुसऱ्यातून तिसऱ्यात असे फिरू लागले. कामाच्या शोधात - काम करता करता त्यांच्या कोवळ्या हातांना घट्टे पडून त्यातून रक्तस्राव व्हायला लागला. खूप कष्टातही त्यांचे चेहरे मात्र हसतमुख असत. ते जिथे-जिथे ज्याच्या-ज्याच्याकडे म्हणून कामाला जात त्यांचे गुण, बोलण्याची, चालण्याची कला, व्यवहार बघून सर्वांना हेच वाटे ही कुणी साधारण मुले नसावीत. राजकुमारांसारखे ह्यांचे वर्तन आहे. पण कुठे-कुठे कुणी काम देणारा त्यांच्याकडून अती कष्ट करवून त्यांचा अपमानही करायचे. पण तरी अशा लोकांशी ते दोघे फार चांगली वागणूक ठेवत. अजून चांगले काम करून देत.

मिळणाऱ्या थोड्याफार मिळकतीतून ते दोघे गरजूंना दानधर्मही करत. कधी जेवायला बसले असता दारी कुणी भिकारी आला असता, बाकी लोक त्याला पळवत, पण रूप-बसंत मात्र आपल्या ताटातील भाकरी त्या भिकाऱ्याला देताना तत्परता दाखवत. आजूबाजूच्या लोकांच्या अड-अडचणींना धावून जात. रुप-बसंत देवभक्ती, पूजा-अर्चना, व्रत नेम सारे काही करत. ते ज्या-ज्या गावात जात, त्या-त्या गावातील गावकरी आपल्या अडचणींतून बाहेर येण्यासाठी त्यांचा सल्ला अवश्य घेत.

एकदा त्या दोघांना असे वाटले आपण किती दिवस असे छोट्या-छोट्या गावातून काम करत राहू - आता मोठ्या नगरात जाऊन काहीतरी मोठे काम अथवा धंदा करून बघू. असा विचार करून ते नगराच्या दिशेने निघाले. कोणतेही साधन नसल्याने ते पायीच प्रवासाला निघाले. चालता-चालता फार मोठे जंगल लागले, त्यातच रात्रही झाली. त्यांनी विचार केला की आजची रात्र ह्या जंगलातच विसावू. त्यांनी आपसात ठरविले की, रात्रीच्या ४ प्रहरांपैकी २ प्रहर रुपने पहारा द्यावा, बाकीचे २ प्रहर बसंताने जागावे. मोठ्या भावाने (रुप ने) छोट्या बसंताला म्हटले, ''बसंता तू झोप, आधी मी पहारा देतो.'' बसंत झोपला. रुप पहारा देत बसला, जेव्हा २ प्रहर झाले, तेव्हा रुपला काही छोट्या भावाला उठवावे असे वाटेना. तो तसाच जागत बसला. ३ प्रहर पूर्ण होत आले, तसे अचानक बसंत जागा झाला. आकाशातील तारे बघून भावाला म्हटले, ''दादा, तू मला ३ प्रहर झोपू दिलेस? मला क्षमा कर गाढ झोप लागली होती. पण आता तू झोप, मी देतो पहारा.'' दिवसभर चालून-चालून तसेच ३ प्रहर रात्रीचे पहारा देत

जागल्याने रुप खूप थकला होता. तो लगेच गाढ निद्राधीन झाला. आता बसंत जागा राहून पहारा देत होता. त्या वेळी झाडावर बसलेले राघू-मैना आपसात बोलत होते की, ''आपण बसलेल्या झाडाला वर्षातून एकच फळ येते. पण हे फळ असे आहे, की हे जो तोडेल, त्याला विषारी नाग चावेल आणि जो ते फळ खाईल, तो सकाळ होताच या राज्याचा महाराजा बनेल. पण महाराजा बनताच त्याची पूर्व स्मृती जाईल पण त्याचे संस्कार मात्र जागृत राहतील. जोपर्यंत त्याला कुणी ते आठवण करून देणार नाहीत, तोपर्यंत त्याला मागचे काहीच आठवणारही नाही. पण ज्या क्षणी त्याला कुणी आठवण करून देईल, त्याला जुन्या स्मृति आठवतील. म्हणूनच आजपर्यंत अनेकांनी हे फळ खायचा खूप प्रयत्न केला पण विषारी नागाने त्यांचा चावा घेऊन घात केला. राघू मैनेचे हे बोलणे ऐकून बसंताच्या मनात विचार आला, की आम्ही तर दोन भाऊ आहोत. दादानी (रुप) तर राघू-मैनेच्या गोष्टी ऐकल्या नसल्याने त्याला, त्याबद्दल काहीच माहीत नाही. मग मी असे केले तर - मी फळ तोडून दादाला देतो, ते खाऊन तो महाराजा बनेल, कारण त्याच्यात माझ्यापेक्षा जास्त प्रजापालनाचा गुण आहे. तो आपल्या प्रजेला नक्कीच सुखात ठेवेल.

राजकुमार बसंत स्वत: फळ खाऊन महाराजा बनू शकला असता. तरी पण त्याने झाडावरचे फळ तोडले आणि लगेच राजकुमार रुपला उठवून म्हणाला, ''दादा, अरे या झाडावर खूप सारी गोड फळे होती. मी तर खूप खाल्ली. आता हे शेवटचे फळ उरले आहे. घे हे तू खा बर!'' असे म्हणून रुपला ते फळ खाऊ घातले. थोड्याच वेळात एक विषारी नाग आला, राजकुमार बसंतला डंख मारून तो क्षणात सळसळत निघून गेला. बसंत बेशुद्ध झाला. तेव्हा लगेच रुपने त्याला उचलून जवळच वाहणाऱ्या नदीच्या किनारी नेले. नागाने जिथे डंख मारला होता, त्या जागी पायावर थोडी चीर करून, त्याचा पाय वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात धरला. जेणेकरून रक्ताबरोबर नागाचे विषही प्रवाहात वाहून जाईल. आता पहाट होत आली होती. झुंजुमुंजु होऊन पहाटेचा सूर्य उगवतीला प्रकाशू लागला. तसे थोड्याच अंतरावर राजकुमार रुपला नगर दिसले. कुणी वैद्य भेटतो का, ते बघायला त्याने नगराकडे धाव घेतली.

त्या नगरातील राजाला मूलबाळ नव्हते. राजाच्या मृत्युनंतर राजपुरोहिताने दवंडी दिली की, संपूर्ण राज्याच्या लोकांनी नगराच्या चौकात एकत्रित यावे, हत्तीण ज्याच्या डोक्यावर पाण्याचा कुंभ (जलकलश) ठेवेल, तोच ह्या राज्याचा नवा राजा होईल. या त्यांच्या आज्ञेप्रमाणे पहाटेच उजाडायच्या आत चौकात सर्व नगरवासी जमले.

दुसरीकडे राजकुमार रुप वैद्याच्या शोधात त्याच राज्यात गेला, पण हे काय प्रत्येक घराला कुलुप! कुणीच दिसेना रस्तेही ओस. पण नगराच्या चौकात पोहोचताच त्याला खूप गर्दी दिसली. तो लोकांना वैद्य कुठे भेटतील चौकशी करत राहिला. तेवढ्यात हत्तीण फिरत-फिरत त्याच जागी येऊन थांबली, जिथे राजकुमार रुप याच्या डोक्यावरच जल-कलश धरला. जल-कलश डोक्यावर पडताच रुप मागील सर्व आठवणी विसरला. त्याच्याकडे फक्त राजाचे संस्कार शिल्लक राहिले. साधारण रुपातील राजकुमार रुप, जो मूळातच राज्य कुळातील राजकुमार होता. आता खरोखरीच राजा बनला. राज्याभिषेकानंतर जेव्हा त्याने राज्यकारभार सुरू केला. तेव्हा संपूर्ण राज्यात सुख-शांतीचे साम्राज्य पसरले. तो आपल्या प्रजेला सर्व प्रकारच्या सुख-सोयी देण्यासाठी तत्पर असायचा. दिवसा आणि रात्री सुद्धा नगरात फिरून लोकांची दु:खे, अडी-अडचणी समजून घेऊन राज दरबारात त्यावर तोडगा काढून लोकांना सुखी समाधानी करायचा. त्याचे प्रजेवर पोटच्या मुलासारखे प्रेम होते. अशाप्रकारे थोड्याच कालावधीत तो एक लोकप्रिय (प्रजाप्रिय) राजा बनला. तिकडे राजकुमार बसंत नदी प्रवाहात वाहत-वाहत नगराच्या घाटाकडील प्रदेशात आला, तेव्हा तेथे कपडे धुवत असलेल्या धोब्याने त्याला प्रवाहातून किनाऱ्याला आणून त्याचे प्राण वाचविले. शर्थीचे प्रयत्न करून धोब्याने त्याला शुद्धीवर आणले. थोडे बरे वाटताच राजकुमार बसंत आपल्या भावाला शोधायला निघाला. थोडी चौकशी केली असता त्याला कळले, की त्याचा भाऊ ह्याच राज्याचा महाराजा बनला आहे. पण बसंताला हेही माहीत होते की, त्याचा भाऊ रुप स्मृति विसरून गेला असणार, पण मी जर त्याला आठवण करून दिली, तर त्याला सर्व काही आठवणार हे नक्की.

मग राजकुमार बसंत थोडी युक्ती करून राजदरबारात पोहोचला. तो शाहीर म्हणून राजदरबारात गेला. आपल्या गाण्यातून (पोवाड्यातून) त्याने आपली आणि आपल्या भावाची पूर्ण कहाणी राजाला ऐकवली. ते गीत

ऐकता-ऐकता महाराज रुपची पूर्व स्मृती जागृत झाली. त्याने तात्काळ आपल्या भावाला राजकुमार बसंतला ओळखले. दोघा भावांचे पुनर्मिलन झाले.

महाराजा रुपने आपला भाऊ बसंताला आपला प्रधान मंत्री बनविले आणि मग दोघा भावांनी खूप नीतिमत्तेने आपला राज्यकारभार सांभाळला.

वरील गोष्टींचा आध्यात्मिक अर्थ

बाबा (शिवपिता) आपल्याला (मुलांना) म्हणतात, की, ''बाळांनो आता ह्या वेळेस तुम्ही वनवासात आहात, म्हणूनच खूप-खूप साधेपणाने आपले जीवन व्यतीत करा, पण तुमच्या बोलण्यातून, व्यवहारातून सर्वांना प्रतीत व्हावे, की हे कुणी साधारण लोक (आत्मे) नाहीत. ही तर दैवी वा कुणी ईश्वरी आत्मे आहेत. जसे राजकुमार बसंताने सर्व गोष्टी माहीत असूनही आपल्या भावाला (राजकुमार रुपला) महाराजा बनवले, तद्वत् तुम्हा मुलांमध्ये त्यागभावना असावी. जेव्हा तुम्ही मुले सत्ययुगात राजा बनाल, तेव्हा तुम्ही जुनी स्मृती, जी आत्ता ईश्वरी ज्ञानाच्या रुपात आहे, ती विसरून जाल. परंतु तुमचे दैवी गुण संस्काराच्या रूपात जागृत राहतील. कल्पाच्या शेवटी मी येऊन पुन्हा एकदा तुम्हा मुलांना सृष्टिच्या आदि मध्य, अंताचे ज्ञान देईन, तेव्हा कुठे तुमची जुनी ईश्वरीय स्मृती जागृत होईल.'' हीच आहे रुप-बसंत कहाणीची आध्यात्मिकता!

स्रोत- मुरली में आनेवाली कहावते और कहानियाँ

***

(पृष्ठ क्र. २० वरून)

बहिणींच्या बदल्या करण्यात येतील, असा कार्यक्रम माउंट आबूवरून आला. आमच्या सेंटरची निमित्त बहीण दुसऱ्या सेंटरवर गेली आणि दुसऱ्या सेंटरवरची निमित्त बहीण आमच्या इथे आली. ह्या नव्या दीदींकडून मी स्वत:बरोबर अजून दोन कुमारांना मधुबनला जायची परवानगी घेतली. मी १९९३ला पहिल्यांदाच ज्ञान-सरोवरच्या पुण्य भूमीवर आलो. ह्या भूमीवर माझी पावले जी पडली, ती परत न जाण्यासाठीच जणू! ज्ञान सरोवरमध्ये ८ महिने खूप प्रेमाने, सच्च्या मनाने सेवा केल्यानंतर मला 'पीस पार्क'च्या सुरुवातीच्या (निर्मितीच्या) वेळी सेवा करण्याचे भाग्य लाभले. तिथेही मी फार मन लावून श्रद्धापूर्वक सेवा केली. माझा हाच संकल्प असायचा की इथे येणारा प्रत्येक आत्मा बाबांच्या परिचयापासून वंचित राहू नये. पीस पार्कच्या निमित्त भावाचीही मला फार मदत झाली. पीसपार्क मध्ये ४ वर्षे सेवा केल्यानंतर मला शांतीवन येथील कॅसेट विभागात कायमस्वरूपी सेवेसाठी ठेवले गेले. ही सेवा करताना मला खूप फायदा झाला - तो असा की 'डायमंड हॉल' च्या एकदम स्टेजच्या (बाबांच्या) समोर बसण्याची संधी मिळाली. त्यामुळेच बाबांची प्रत्येक अव्यक्त मुरली मी बाबांना खूप जवळून बघत, अनुभव घेत ऐकली. अशाप्रकारे मी आपले भाग्य बनवले. संगमयुगातील प्रत्येक क्षण सफल केला. प्रत्येक क्षणी पुण्याचे खाते जमा केले. प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला.

जगातील सर्व आत्म्यांना मी हाच संदेश देऊ इच्छितो, की वर्तमान संगमयुगात परमपिता परमात्मा शिव ह्या धरेवर अवतरित होऊन भाग्य वाटत आहेत. जेवढी झोळी भरायची असेल, आत्ताच घ्या ... आत्ता नाही, तर कधीच नाही.

(संदर्भ - ज्ञानामृत, मार्च २०२४)

***

## द्रौपदी

पांडवांची पत्नी द्रौपदी, हस्तीनापूरातील भर सभेत अशा परिस्थितीत अडकली, जिथे तिचे शील अडचणीत आले. ह्यांचे वर्णन एक अद्भूत आध्यात्मिक रहस्य स्पष्ट करण्यासाठी केले गेले आहे. शिवबाबा म्हणतात, ही संपूर्ण घटना समर्पण भाव सुचवते. कलियुगात भोळ्या-भोळ्या मातांवर खूप जुलूम होतात. त्यांचे प्रतीक - द्रौपदी आहे.

जेव्हा द्रौपदी स्वत:ला, आपल्या शक्ती विसरून, सभेतील सर्व लोकांना विसरून ईश्वराला शरण गेली - तेव्हा परमेश्वराने तिचे रक्षण केले. अर्थात जेव्हा आपण ही संपूर्णपणे ईश्वराला समर्पित होतो, तेव्हाच 'तो' आपल्या (मुलांचा) सांभाळ, रक्षण स्वत: करतो.

ही कथा आहे ईश्वराप्रती समर्पण भाव आणि संपूर्ण निश्चयाची.

स्रोत- मुरली में आनेवाली कहावते और कहानियाँ

# दादी रतन मोहिनी यांचे काही मौलिक विचार



१) स्वत:ला मी जसा आहे तसा स्वीकारणे - हीच आत्मोन्नतीची पहिली पायरी आहे. स्वत:ला स्वत:तील गुण - दोषांसकट स्वीकारले म्हणजे मग तीच पहिली पायरी तुम्हाला यशाच्या कळसापर्यंत नेऊन पोहोचेल. हीच पहिली पायरी यशाच्या शिखरावर पोहोचण्याचा मजबूत पाया ही बनेल. त्यामुळे व्यक्तींमध्ये स्वत:ला बदलण्याची लवचिकता आणि प्रामाणिकताही येईल. आंतरिक बदलाशिवाय फक्त बाह्य गोष्टींनी हवा तसा बदल घडणार नाही. बाह्य गोष्टींवर अवलंबून राहिल्यास त्या दुष्ट चक्रात अडकण्याचीच जास्त शक्यता आहे. - कारण आंतरिक बदलाशिवाय आत्मोन्नती कधीच शक्य नाही. ते फक्त बाहेरील खोटे जग आहे. म्हणूनच स्वत:ला खोलवर ओळखण्याची गरज आणि तसे प्रत्यक्षात आणले, तर मात्र त्यातून एका असामान्य जीवनाची सुरुवात होऊन व्यक्ती नखशिखांत बदलेल.

२) प्रत्येक व्यक्ती जी यशाच्या शिखराकडे वेगाने प्रवास करते, तिच्या जीवनात एक प्रकारचे अनुशासन (स्वत:ला कसे घडवावे याचा थांग असणे) असते. हो ते तुम्हाला अनुवांशिकतेने मिळणारा ठेवा नसून स्वत:वर कठोर मेहनत घेऊन तसे घडण्याचा प्रयत्न करणे, यातून ते सिद्ध होत असते. इतिहासाचा धांदोळा घेतल्यास सर्वांनीच स्वत:वर काम करतच जीवनाची लढाई जिंकली. सांप्रत समयी ईश्वराची शिकवण हीच आहे की, 'तुम्ही स्वत:च्या स्व-स्वरूपात अर्थात अत्मिक स्वरूपात स्थित व्हा. अर्थात तुम्ही शरीर नसून एक चैतन्य शक्ती आत्मा आहात - कर्मेन्द्रियांचा राजा आहात-' असा अभ्यास केल्यास स्वत:ला (राज्य करणे सोपे जाईल) तसे समजणे सोपे जाईल. कारण आत्मा राजा आहे आणि कर्मेन्द्रिय कर्मचारी आहेत. राजा आपल्या स्व-स्वरूपात शक्तीशाली असतो.

३) आजच्या जगात, मनुष्य, आपल्या दैनंदिन जीवनात सुख मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न करत आहे. वेगवेगळ्या तांत्रिक साधनांचा वापर करत आहे. तसेच त्यात प्रचंड यश मिळवत. आकाशाला गवसणी घालत आहे. पण मनाची शांती कशी मिळवावी - हे मात्र त्याला अवगत नाही. ते जर कळले नाही, तर मात्र आपण एखाद्या भरकटलेल्या भविष्याची रचना करतोय हे समजून जावे.

४) आपला आनंद, सामाजिक पद, पैसा आणि प्रतिष्ठेवर अवलंबून नाही. जर आपण असा विचार करत असू की पद, पैसा, प्रतिष्ठा, सामाजिक मान-सन्मानच सर्व काही आहे, तर त्यामागे कितीही धावले तरी ते धावणे म्हणजे मृगजळाच्या मागे धावणे होय. हे जीवन एक वाळवंट आहे, जिथे तुम्ही खूपशा पाण्याच्या शोधात आहात. मनाचा खरा आनंद आत्म्याचा आंतरिक गुण आहे. जर आपण दररोज आनंद शोधण्यापेक्षा स्वत:मध्ये आनंद आहे असे समजून त्या आनंदाच्या डोही तरंगत राहाल, (तसा विचार करणे म्हणजेच आंतरिक आनंदात राहणे) दुसऱ्यांकडे आनंदासाठी तहानलेल्या नजरेने बघण्यापेक्षा मी स्वत: (खुश) आनंदी राहून दुसऱ्यांनाही आनंद वाटणारा बनेन हा संकल्प करून तसे आचरण करावे.

५) जेव्हा आईच्या वात्सल्याची गोष्ट निघते. तेव्हा त्यासाठी दादींनी आपल्याला हेच शिकवले आहे की, प्रत्येक मनुष्यासाठी आपल्या मनात शुद्ध प्रेम असावे. प्रत्येकालाच त्यांच्यातील कमतरता आणि विशेषतांसहित स्वीकारावे. तेव्हाच आपण समाजात सार्वत्रिक एकता आणू शकू.

६) आजच्या आधुनिक युगात संवादाची अनेक साधने उपलब्ध असूनही समोरासमोरच्या (संवादाला

(पृष्ठ क्र. २८ वर)



# गुरुपौर्णिमा

ब्र.कु. मच्छिन्द्र, मंचर, पुणे

गुरुपौर्णिमेला वास्तविक सत्गुरु पौर्णिमा म्हणायला पाहिजे. ज्ञानमार्गात येण्यापूर्वी आपण गुरुवारला गुरुवारच म्हणत होतो. परंतु आता जो सर्वांची सद्गति करतो, तो मिळाला म्हणून सत्गुरु वार म्हणतो आणि म्हणून सत्गुरु पौर्णिमा म्हणायला पाहिजे. असो.

भक्ति मार्गात, तसेच लौकिक दुनियेत या दिवसाला किती महत्व आहे. या दिवशी भक्तिमार्गात मोठ-मोठे कार्यक्रम ठेवतात. व्याख्याने आयोजित करतात. गुरु महिमाची गीते, प्रार्थना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमही असतात. शहरामध्ये रोषणाई केली जाते. विशेष करून, दत्तमंदिरामध्ये रोषणाई केली जाते. कारण मनुष्य दत्ताला गुरु समजतात. गुरुचरित्राचे वाचन करतात. ते या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' म्हणतात. व्यास महर्षींनी महाभारत लिहिले म्हणून व्यास महर्षींना गुरु समजतात. म्हणून या दिवशी व्यास पूजा केली जाते.

पौर्णिमेचा चंद्र जसा संपूर्ण असतो, तसा गुरु हा सर्व गुणांनी पूर्ण असतो. म्हणून पौर्णिमेच्या दिवशीच गुरुपौर्णिमा असते. गुरुपौर्णिमा ही आषाढ शुद्ध पौर्णिमेला असते. आषाढ शुद्ध एकादशी पंढरपूर यात्रा झाल्यानंतर असते.

तर गुरुपौर्णिमा हा काही सण नाही. आजचा हा दिवस म्हणजे काही गुरुची जयंती किंवा पुण्यतिथी नसते. तर -

१. अ) हा गुरुचा महिमा गाण्याचा दिवस आहे.

आ) गुरुंनी केलेल्या उपकाराची जाणीव ठेवण्याचा दिवस आहे.

इ) गुरुंनी केल्या उपकाराची परतफेड करण्याचा दिवस आहे.

ई) गुरु शिष्याचे नाते जपण्याचा दिवस आहे.

उ) गुरुंना गुरुदक्षिणा देण्याचा दिवस आहे.

ऊ) गुरु कसा असावा, शिष्य कसा असावा हे सांगण्याचा दिवस आहे. समजून घेण्याचा दिवस आहे.

२. अनेकजण गुरु करतात. म्हणतात जन्माला येऊन गुरु करावा लागतो. गुरुविण कोण दाखविल वाट. गुरुविण सत्गती नाही असे म्हणतात. लहान मुलाने सुद्धा गुरु केला पाहिजे असे म्हणतात. म्हणून त्यालाही गुरु करवितात. त्याचीही दुर्गती व्हायला नको, म्हणून त्यालाही लवकरच गुरु करून देतात.

३. भक्तिमार्गात जे लोक गुरु करतात, त्यांना गुरु कानात काहीतरी मंत्र सांगतात आणि तो मंत्र इतर कुणालाही सांगायचा नसतो. शिवपिता, सद्गुरु रुपात आपल्याला जो मन्मना भवचा मंत्र देतात, तो सर्वांनाच सांगून सर्वांचेच कल्याण करण्यासाठी असतो. भक्तिमार्गात गुरुचे दर्शन रोज होईल असे सांगणे कठीण परंतु सद्गुरु इथे आपल्याला रोज ज्ञान सांगत असतो.

४. लौकिकमध्ये मनुष्य आपल्याला ज्याच्यापासून ज्या गोष्टीचे ज्ञान मिळते. त्याला ते गुरु मानतात. गुरु समझतात. हार्मोनियम शिकवणारा, तबला किंवा इतर वाद्ये शिकवणारा, नृत्यकला, चित्रकला किंवा इतर कला शिकविणाऱ्याला ते गुरु मानतात.

५. भक्तिमार्गात दत्त महाराजांना गुरु मानतात. गुरुदेव दत्त म्हणतात. परंतु स्वतः दत्तात्रय महाराज म्हणतात - ''जो जो जयाचा घेतला गुण, तो-तो गुरु केला म्या जाण, गुरुशी आले अपारपण, जग संपूर्ण गुरु दिसे.'' मुरलीमध्ये सुद्धा बाबा दत्तात्रय महाराजांचे नाव घेतात. बाबा म्हणतात - दत्तात्रय जेसे गुण उठाओ।

६. आपल्याला माहित आहे की कौरव-पांडवांचे गुरु द्रोणाचार्य हे कौरव-पांडवांना धनुर्विद्या शिकवत असत. तेव्हा त्यांच्याकडे एक भिल्लाचा मुलगा 'एकलव्य' धनुर्विद्या शिकण्यासाठी आला होता. द्रोणाचार्यांनी त्याला 'तू अस्पृश्य आहेस. मला तुला ही विद्या शिकविता

येणार नाही. म्हणून मनाई केली.' तरी सुद्धा एकलव्याला राग आला नाही, वाईटही वाटले नाही, नाराजही झाला नाही. परंतु त्याने जिद्द सोडली नाही. त्याने द्रोणाचार्यांना मनोमन गुरु मानले. त्यांच्यावर अपार श्रद्धा ठेवली. त्याने एक मातीची द्रोणाचार्यांची मूर्ती बनविली. करता-करता तो धनुर्विद्येत हुशार झाला, तरबेज झाला, प्रवीण झाला. त्याला खूप आनंद झाला.

असेच एकदा द्रोणाचार्य पांडवांबरोबर त्याच रस्त्याने जात असता एक कुत्रा मोठमोठ्याने त्यांच्यावर भुंकत होता. माझ्या गुरुंवर कुत्रा भुंकत आहे. मला याचे तोंड बंद केलेच पाहिजे. म्हणून त्याने त्या कुत्र्याच्या दिशेने बरेच बाण सोडले. ते सर्व त्या कुत्र्याच्या तोंडात जाऊन अलगद बसले. व त्या कुत्र्याचे भुंकणे बंद झाले. हे स्वतः द्रोणाचार्यांनी पाहिले. तेव्हा त्यांनी एकलव्याला जवळ बोलावून विचारले, ''तू ही विद्या कोठून आणि कोणाकडून शिकलास?'' तेव्हा त्याने सांगितले, ''गुरु महाराज आपणच तर मला ही विद्या शिकवली. तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. मग, एकलव्याने त्यांना त्यांची मातीची मूर्ती दाखवली. अन् म्हणाला, ''तुम्हालाच तर विचारून मी हे बाण असे सोडत होतो. तुम्हीच तर म्हणत होता - असा धनुष्य धर, असा नेम धर, असा बाण मार. तुम्हीच माझे खरे गुरु आहात आणि त्यांना साष्टांग दंडवत घातला. तेव्हा द्रोणाचार्य म्हणाले, ''जर तू माझा शिष्य आहेस, मी तुझा गुरु आहे, तर मग मला गुरुदक्षिणा द्यावी लागेल. तेव्हा एकलव्य म्हणाला, ''गुरु महाराज, आपण जी दक्षिणा मागल ती मी तुम्हाला द्यायला तयार आहे. सांगा.''

तेव्हा द्रोणाचार्यांनी तो जो उजव्या हाताच्या अंगठ्याने बाण सोडत होता तोच अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मागितला. तेव्हा एकलव्याने त्यांना तात्काळ बाणाच्या धारदार टोकाने उजव्या हाताचा अंगठा कापून गुरुदक्षिणा म्हणून दिला.

नंतर पुढे तो डाव्या हाताच्या अंगठ्याने बाण मारायला शिकला. यामागे कदाचित द्राणाचार्यांचा स्वार्थ असेल की अर्जुनापेक्षा कोणीही धनुर्विद्येत हुशार, तरबेज असू नये. असो.

तर आपल्या गुरुवर अशी अपार श्रद्धा असावी लागते, भक्ती असावी लागते. प्रेम असावे लागते.

७. अशीच आपल्या ज्ञानमार्गात ब्रह्माबाबांची गुरुवर अपार श्रद्धा होती. परंतु त्यांनी एकच गुरु केला नव्हता. त्यांनी १२ गुरु केले होते. एवढे करण्याचे कारण त्यांच्या मनाचे समाधान होत नव्हते. १२ व्या शेवटच्या गुरुंवर सुद्धा अपार श्रद्धा होती. गुरु आपल्या घरी यायचे म्हटल्यावर त्यांना किती आनंद व्हायचा. गुरुंसाठी काय करू आणि काय नाही असे त्यांना व्हायचे.

असेच एकदा गुरु महाराज आपल्या फार मोठ्या शिष्यांसह त्यांच्याकडे आले. बाबांनी त्यांचे मोठ्या आदराने स्वागत केले. गुलाबाच्या पाण्याचे भरलेल्या बाटल्या आणल्या. गुरु शौचगृहात जाण्यापूर्वी ते स्वतः गुलाब पाणी शिंपडत असत. आपल्या गुरुंच्या आरामाकडेही ते फार लक्ष देत असत. गुरु आराम करत असताना बाहेरच्या बेवारशी कुत्र्यांच्या भुंकण्याने गुरुंचा आराम भंग पावू नये म्हणून बाहेर पहारेकरी नेमत असत.

कोणत्याही परिस्थितीत ते आपल्या गुरुंची आज्ञा शिरोधार्य मानत असत. एकदा काय झाले, बाबांच्या घरात काही महत्त्वाचे कार्य होते. नेमके त्याच वेळी बाबांना आपल्या गुरुंची तार आली. ताबडतोब निघून यावे. त्यांनी आपली पत्नी यशोदेला सांगितले, 'मला लगेच निघायला हवे.' यशोदा म्हणाल्या, 'अशा वेळेस आपण कसे जाऊ शकता?' तेव्हा बाबा म्हणाले, 'गुरुंचे बोलावणे म्हणज यमाचे बोलावणे, काळाचे बोलावणे. यमाने बोलावल्यावर आपण असे म्हणू शकतो का? थांबा आज माझ्या नातवाचा नामकरण विधी आहे.' असे म्हणून ते तेथून निघून गेले.

गुरुंकडे गेल्यावर त्यांना कळले की, गुरुजींनी आपल्याला यासाठी बोलावले आहे की, त्यांचा एक शिष्य जुगारात सट्ट्यात १० हजार रुपये हरला होता. त्याला १० हजार रुपये हवे होते.

कबीरांनी एके ठिकाणी सांगून ठेवले आहे.

**सत्गुरु मिले जु सब मिले, न तो मिला न कोयं।**

**मात-पिता सुत बांधवा, ये तो घर घर होय॥**

शिवपिता या सृष्टीवर अवतरित होतात आणि मनुष्यात्म्यांशी तीन प्रमुख संबंध प्रस्थापित करतात. १) पिता-पुत्राचा अर्थात् परमेश्वर सर्व मनुष्यात्म्यांचा पिता आहे आणि सर्व मनुष्य-प्राणी त्याची मुले आहेत. या नात्याद्वारे आपल्यातील बंधुभाव जागृत होतो. एरव्ही आपण जरी म्हटले तर मनात हा भाव किती शुद्ध रुपात जागृत होतो ते ज्याने त्याने ठरवावे. सर्वांविषयी समभाव हवा, माणुसकीचा दृष्टिकोन

असावा हे आपण म्हणतो; पण अध्यात्मशास्त्र सांगते, जोवर दैहिक दृष्टी आहे तोवर भेद उत्पन्न होतच राहणार म्हणजेच कृष्ण-श्वेत वर्ण, मराठी-गुजराती इत्यादी भाषाभेद, प्रांत भेद असे काही ना काही भेद मनात उपजत राहतात. मात्र जेव्हा आपण सर्व सूक्ष्मातिसूक्ष्म चैतन्य आत्मा आहोत, देह नाही हे आत्मभान वाढीस लागते. तेव्हा देहभावनेतून उद्भवणारे भेद मावळायला लागतात. अशा अभ्यासातूनच एकात्मतेची भावना वाढीस लागू शकते. २) शिवपिता दूसरे नाते प्रस्थापित करतात. परमशिक्षक आणि विद्यार्थ्यांचे. ब्रह्माबाबांना माध्यम बनवून जे ज्ञान रोज दिले त्यास 'ज्ञान मुरली' म्हटले जाते. मनुष्यात्मा ८४ जन्म घेतो, ८४ लाख योनीतून आत्म्याचा प्रवास घडत नाही. सद्यकाळ 'पुरुषोत्तम' संगमयुगाचा आहे. अशा शाश्वत सत्याची ओळख परमशिक्षकाच्या भूमिकेतून करून देतात. ३) सतुगुरु आणि त्याचा अनुयायी हे तिसरे नाते प्रस्थापित करतात. शिवपिता सद्गुरु रुपात, वैराग्याचे बीज मना-मनात स्थापित करतात. आजवर आपण देह नसून आत्मा आहोत हे ज्ञानाच्या स्तरावर जाणत होतो परंतु त्याचा अभ्यास नव्हता. देहभानापासून मुक्त होणे म्हणजेच विकारांपासून मुक्त होण्याचा प्रवास सुरू करणे, हे ज्ञान शिवपिता समजावतात. याद्वारे आजपर्यंत चालत आलेली कर्मकांडे दूर सरतात; पण भक्ती म्हणजे ईशप्रीती मात्र वाढीस लागते. भक्तीचे खरे फलित हेच तर आहे. या सगळ्याची समज येत जाते. कबीरांच्या दोह्याचा सखोल विचार केला तर जाणवते, जेव्हा ईश्वरच सद्गुरु रुप धारण करुन अनुभूती करवतो तेव्हा बुद्धीद्वारे इतर सर्वांची आठवण विसरणे आणि सर्वशक्तीवान निराकारावर ध्यान केंद्रित करणे म्हणजे खरी साधना आहे. माझे स्वत:चे काही नाही, जे काही आहे ते 'देणे ईश्वराचे' हाच भाव अंतरी रहावा. हीच साधनेतील उच्च पातळी आहे. गुरु आपल्याला ईश्वरापर्यंत घेऊन जातो असे आपण आजपावेतो ऐकले; पण जेव्हा ईश्वरच सद्गुरु रुपात आपले भरण-पोषण करतो तेव्हा दैहिक बंधने गळून पडतात. या विषयाबाबत अधिक जाणून घ्यायचे असल्यास ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रावर शिकवला जाणारा साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण करा. शेवटी कबीरांच्याच एका सुंदर दोह्याने ह्या लेखाचा समारोप करतो.

**मनहिं दिया निज सब दिया, मन से संग शरीर।**
**अब देवे को क्या रहा, यो कथि कहहिं कबीर।।**

अशीच सर्व साधकांची अवस्था होवो ही गुरुपौर्णिमेनिमित्त शुभकामना !

***

(पृष्ठ क्र. २५ वरून)

अथवा) भेटीलाच सर्वात चांगला संवाद मानला जातो. वेळ, अंतर तसेच कधी-कधी अती व्यग्रतेमुळे, आपण वैज्ञानिक संवाद साधने (जसे फोन, व्हॉटस् ॲप, फेसबुक ट्वीटर, इंस्टाग्राम) सर्रास वापरतो, पण आपल्याला माहीत आहे का ही आधुनिक संसाधने जेवढी प्रभावी आहेत, तेवढेच ते मोहजाळ देखिल आहे. कारण हळूहळू ह्या आधुनिक संवाद साधनांचा प्रभाव आपल्यावर ही पडू लागतो आणि आपणही कोरडे भावना शून्य होऊ लागतो. म्हणूनच अनेक प्रकारचे बहाणे देऊन आपण आपल्या जीवनातील विघ्नांना तोंड देणेही थांबवतो आणि हाच मग संस्कार बनतो. जो यशाच्या मार्गात खोडा बनतो म्हणूनच विघ्नांसमोर, अडचणींसमोर गुडघे न टेकता, त्याला धीराने तोंड द्यावे, जेणेकरून त्या अडचणींचा नेहमीसाठी निचरा होईल. ७) तुमचे विचार तुमच्या प्रगतीच्या सीमा निश्चित करू शकतात, म्हणूनच सदैव आपल्या विचारांना प्रगल्भ आणि सकारात्मक बनवण्याच्या प्रयत्नात असावे. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि यशाचे मार्ग खुले होतात.

***

## अचलगढ

माउंट आबूपासून सुमारे १० कि.मी. दूर वर एक छोटेसे गाव अहे. जिथे अचलेश्वर महादेव शिवाचे मंदिर आहे. हे खूपच खास असे शिवमंदिर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या मंदिरात शिवलिंग नसून शिवलिंगाच्या जागी एक भुयार आहे. त्यात रंगीबेरंगी दगड आहे. ह्यालाच शिवाचे  पदकमल मानतात. इतर शिवमंदिराप्रमाणेच ह्या मंदिरात ही नंदी आहे. अचलेश्वर शिवबाबा आपल्या मुलांना प्रत्येक परिस्थितीत अचल आणि स्थिर राहण्याचे शिक्षण देतात. जे प्रत्येक परिस्थितीत अचल (स्थिर) राहतात, तेच विजयी आत्मे आहेत. ह्याच बरोबर येथे जैन धर्माचेही सुंदर मंदिर बांधलेले आढळते.